शनिवार
२२ मे १९७१

# माणूस

किंमत
पन्नास पैसे




" ....माझ्या मते, आपल्या पक्षासाठी आता व्यवहार्य असा एकच कार्यक्रम आहे – नवकाँग्रेसमध्ये विलीन व्हायचं...."

## सप्रेम नमस्कार....

□ १५ मे च्या अंकातील दि. के. बेडेकर यांचा 'सार्थ जीवनाची दृढ साधना' हा डॉ. धनंजयराव गाडगीळ यांच्यावरील लेख फार आवडला. इतरत्र प्रसिद्ध झालेल्या त्यांच्यावरील लेखात तो उजवा वाटला.

१७ मे, ७१ रत्नाकर देशपांडे, सोलापूर

□ दि. ८ मेचा अंक वाचला. आवडला. त्यातील अनिल वर्वे यांचा लेख उत्कृष्ट आहे. तो पूर्व पाकिस्तानातील सत्य परिस्थितीवर प्रकाश टाकतो. त्याच अंकातले रविंद्र पिंगे आणि बाळाराव सावरकर यांचे लेख आवडले

"तुम्ही भारतीय संघाच्या विजयाबद्दल काहीही लिहिले नाही हे मनाला खटकते" असे धनंजय आगरकर यांनी एका पत्रात लिहिले ते मात्र बरोबर आहे असे वाटते.

१३ मे, ७१ हेमंत जावळी, बार्शी


किंमत पन्नास पैसे

शनिवार २२ मे १९७१

# माणूस

वार्षिक वर्गणी पंचवीस रुपये

परदेशची वर्गणी पंचेचाळीस रुपये

वर्ष : दहावे
अंक : ब्याऐंशीवा (८३)

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

साप्ताहिक माणूस : १०२५ सदाशिव, पुणे ३० : दूरध्वनी : ५७३५९



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी 'माणूस' साप्ताहिकाचे चालक सहमत असतीलच असे नाही. ललित साहित्यातील पात्रें काल्पनिक.

# ऑक्सिजनच्या नळ्या लावून जगण्यासाठी

काँग्रेस महासमितीचे अधिवेशन मुंबईत भरते आहे, याची कुणकुणही शहरात कुणाला लागली नसावी इतका हा प्रसंग कोणत्याही गाज्यावाज्याशिवाय मुंबईत पार पडला. नाही तर काँग्रेस महासमितीचे अधिवेशन म्हणजे मुंबईत कोण धावपळ असायची. शहरात जिकडे तिकडे उत्सवी वातावरण असायचे. सर्वत्र रंगीबेरंगी पोस्टर्स लागलेली बड्या बड्या पुढाऱ्यांची आवकजावक. मोठमोठ्या हॉटेलमधल्या खोल्या अधीपासून बुक झालेल्या. काँग्रेसच्या नव्या अध्यक्षांची भव्य मिरवणूक निघायची.

महासमितीचे अधिवेशन म्हणजे एक भव्य राष्ट्रीय प्रसंग. देशोदेशीचे वार्ताहर गर्दी करायचे. वर्तमानपत्रांमध्ये बॅनर्स यायच्या, फोटो झळकायचे. कारण या अधिवेशनात घेतलेले निर्णय राष्ट्रव्यापी ठरत. त्यामुळे त्यांना तशीच प्रसिद्धी मिळे.

पण यावेळी सगळेच उलटे. जुन्या काँग्रेसच्या महासमितीचे अधिवेशन मुंबईत भरते आहे याची ढीम कुणाला जाणीवही नव्हती. पूर्वी हे अधिवेशन षण्मुखानंद हॉल सारख्या आलीशान सभागृहात भरायचे. यावेळचे अधिवेशन मात्र दूर अंधेरीला भारतीय विद्या भवनच्या परिसरात कॉलेजच्या छोट्या छोट्या वर्गांमधून. त्यामुळेही कदाचित हा अनुत्साह असावा. देशोदेशीचे वार्ताहर तर सोडाच, पण खुद्द मुंबईच्या वर्तमानपत्रांनीही आपापले एकटे दुकटे वार्ताहर या अधिवेशनासाठी पाठविले. एकूणच वातावरण अनुत्साहाचे होते. दात जाऊन तोंडाचे बोळके झालेल्या म्हातारीसारखे जुन्या काँग्रेसचे स्वरूप वाटत होते.

पहिल्या दिवसाच्या कार्यकारिणीनेच हा अनुत्साहाचा थकलेला सूर लावला. कार्यकारिणीला येणारे वयोवृद्ध सदस्य चेहऱ्यावर अशी काही प्रेतवत कळा घेऊन प्रवेश करीत होते की अंतःकरणात कालवा कालवा व्हावी. पूर्वी काँग्रेस महासमितीच्या अधिवेशनाचा पहिला दिवस म्हणजे अपूर्व दृष्य असायचे. दूरदूरून येणारे कार्यकारिणीचे सदस्य मोठ्या प्रेमाने एकमेकांना कडकडून भेटत. हास्यविनोद होत, थट्टा मस्करी होई. पण यावेळी का कुणास ठाऊक, कार्यकारिणीचे

अरुण गोसावी

# चाललेली केविलवाणी धडपड

पहिल्या दिवशीचे वातावरण तरी एरवीसारखे वाटत होते. आणि जमलेले बातमीदार म्हणजे चुकार कावळे.

आणि कार्यकारिणीचे रूप तरी कसे. श्री. निजलिंगप्पा, कामराज, मुरारजी देसाई, स. का. पाटील, चन्द्रभानू गुप्ता, राजूभाई शाह, सादीक अली यांच्यासारखे वयोवृद्ध चेहरे कार्यकारिणीत कोणते नववैतन्य आणणार? तारकेश्वरी सिन्हाही गैरहजर होत्या. नवा अध्यक्ष तरुणांमधून निवडायचा होता. पण कार्यकारिणी कुणाचेही नाव एकमताने सूचवू शकली नाही. त्यामुळे दिवसाच्या शेवटी तर सदस्यांचे चेहरे अधिकच दगडी आणि गंभीर दिसत होते.

अशा परिस्थितीत पक्षाने नेमलेल्या उपसमितीने जो कार्यक्रम अधिवेशनात सादर केला तो काही पक्षाच्या एकंदर प्रकृतीला शोभून दिसणारा नव्हता. शेवटच्या पंथाला लागलेल्या म्हातारीने विवाहोत्सुक वधूचा साजशृंगार पोशाख करावा असे केविलवाणे ते दृश्य दिसत होते. नव-काँग्रेसच्या 'पुरोगामी' पणावर कुरघोडी करून 'हम भी कुछ कम नही' हे दाखविण्यासाठीच केवळ या कार्यक्रमातल्या सूचना आहेत की काय असा भास होत होता. हायस्कूलपर्यंतचे शिक्षण मोफत, नागरी उत्पन्नावर मर्यादा, खेडयांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, झोपडट्टयांचे निर्मूलन आणि बेकार, वृद्ध व रोगपीडित लोकांसाठी सामाजिक व्यवस्था या सूचनांमध्ये वेगळे असे काय आहे? मग जुन्या काँग्रेसने नव्या काँग्रेसपेक्षा स्वतःचे वेगळे अस्तित्व राखण्याचा आग्रह धरण्याचे कारण तरी काय? जुन्या काँग्रेसच्या काही गटात हा विचार काँग्रेसमध्ये दुफळी झाल्यापासून कायम आहे. वैयक्तिक मतभेदांचे मुद्दे सोडून दिले तर जुन्या काँग्रेसला नव काँग्रेसपासून अलिप्त राहण्यासाठी भक्कम पायाच नाही असे महासमितीच्या मुंबईतील अधिवेशनाने दाखवून दिले आहे.

अधिवेशनापूर्वी जुन्या काँग्रेसच्या नेत्यांनी जो वेगवेगळी वक्तव्ये केली तीही या दृष्टीने ध्यानात घेण्यासारखी आहेत. तारकेश्वरी सिन्हांनी तर स्वतःच्या पक्षाला

'प्रतिगाम्यांचा बालेकिल्ला' अशी उपाधी दिली आणि पक्षातल्या 'म्हाताऱ्या, थकलेल्या नेत्यांना त्याच्या अल्पसंतुष्टपणातून गदगदा हलवून जागे करण्याचा' आपला मनोदय त्यांनी जाहीर केला होता. स. का, पाटलांनी सरकारशी जुळवून घेण्याविषयी सूतोवाच केले होते तर अध्यक्ष निजलिंगप्पा म्हणाले होते 'शेवट-पर्यंत मी पक्षाशी एकनिष्ठ राहीन. शेवटी एकटा राहिलो तरी हरकत नाही.'

पक्षाचा फड या वक्तव्यांवरून स्पष्ट व्हावा.

मध्यावधी निवडणुकीत आपल्या पक्षाचे जे प्रचंड शिरकाण झाले त्याचे वस्तु-निष्ठ मनोविश्लेषणदेखील पक्षाच्या या अधिवेशनात झाले नाही. पक्षाच्या उप-समितीने सादर केलेल्या अहवालात आपल्या अपयशाची कारणमीमांसा करण्या-ऐवजी पराभवाचे खापर प्रधानमंत्र्यांची सत्ता आणि त्यांच्याकडे येणारा पैसा यावर फोडले आहे. पराभवाची चर्चा करताना या अहवालात पक्षाच्या दोषांची मीमांसा करण्याचा साधा प्रयत्नही नाही हे आश्चर्यकारक आहे. सारा दोष प्रधानमंत्री इंदिरा गांधी आणि त्यांची नवकाँग्रेस यांच्या माथी मारलेला आहे. पराभूत आणि विफल मनोवृत्तीचे प्रदर्शन एवढे उघडपणे व्हावे !

मध्यावधी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर हे अधिवेशन भरले होते. निवडणुकी-नंतर झालेल्या उत्पातामध्ये जुन्या काँग्रेसची म्हैसूर आणि गुजरातेतली सरकारे कोलमडली. गुजरातचे जुन्या काँग्रेसचे सरकार तर अधिवेशनाच्या आदल्याच आठ-वड्यात गेलेले. त्याची छाया अधिवेशनावर पडली होती. पक्षाचे स्वरूप हे असे. अखिल भारतीय पक्ष आहे म्हणून आपले म्हणायचे. म्हणून वृत्तपत्रीय प्रसिद्धीही यथातथाच मिळाली.

कार्यकारिणीच्या बैठकीच्या पहिल्याच दिवशी जनरल इन्शुरन्सच्या राष्ट्रीयी-करणाची घोषणा झाली. त्यामुळे वर्तमानपत्रांमध्ये बातमी म्हणून अधिवेशनाचे मूल्य आणखीनच कमी झाले. काही जणांचे म्हणणे तर असे की केवळ त्यासाठीच जनरल इन्शुरन्सची घोषणा मुद्दाम तेरा मे रोजी करण्यात आली.

अधिवेशनातून पक्षाची फारशी तेजस्वी अशी प्रतिमा बाहेर पडल्यासारखी दिसली नाही. उलट शेवट जवळ आलेला एक म्हातारा पक्ष जगण्यासाठी नाकात ऑक्सि-जनच्या नळ्या लावून इंजेक्शने घेतो आहे असेच वाटत होते. हा पूर्वग्रह असेल. पण वाटत होते खरे !

□ □ □

दिल्ली वार्ता

छोटेबाबू

# तरुण रक्ताला वाव

केंद्रीय मंत्रीमंडळात बऱ्याच नव्या रक्ताला वाव देण्याचे धाडस दाखवून इंदिरा गांधींनी एक प्रकारे निवडणुकी आधीचे आश्वासन पाळण्याचा प्रयत्न केला आहे. आता ५५ मंत्र्यांच्या यादीत अंदाजपत्रकी अधिवेशनानंतर आणखी भर पडेल किंवा नाही याविषयी दुमत होण्याची शक्यता असली तरी खाते पालट व बढती असे प्रकार मात्र निश्चित होतील असा रंग दिसतो.

उदाहरणार्थ इंदिराजींचे प्रमुख सल्लागार व आतापर्यंतच्या राजकीय कारकीर्दीत सत्तेपासून दूर राहिलेले उमा शंकर दीक्षित यांना गृह निर्माण खाते दिले आहे. अनेकांना वाटते या जोडीला त्यांना आणखी नवी खाती मिळतील. विशेषतः के. के. शहा तामिळनाडूचे राज्यपाल म्हणून गेले की त्यांच्या आरोग्य व कुटुंब-नियोजन खात्याची जबाबदारी दीक्षितांकडे देण्यात येईल.

नवी यादी तयार करताना पंतप्रधानांनी तरुण–अनुभव नसला तरी–मंडळींचा जसा विचार केला तसाच जात, धर्म, अल्पसंख्याक वगैरे गोष्टींनाही प्राधान्य दिलेले दिसते. मागास जाती व जमातींना खूप चांगले प्रतिनिधित्व मिळाले. याशिवाय निरनिराळ्या राज्यांना खूष करण्याचाही बाईंनी प्रयत्न केलेला दिसतो. बिहार उत्तर प्रदेशच्या अनेक नव्या प्रतिनिधींना एकदम मंत्रीपद लाभले आहे.

एवढेही करून नाराजी, रुसवे फुगवे आहेतच. एकच नमुना सांगतो. रविवारी यादी जाहीर झाली तेव्हा कार्तिक ओरॉं दिल्लीत होते. (म्हणजे असणारच!) त्यांना दळणवळण खात्याचे उपमंत्रीपद मिळाले. पण आपल्या जमातीला पुरेशी संधी मिळत नाही, किमान राज्यमंत्रीपद तरी आपल्याला मिळायला हवे होते असे त्यांना वाटले. चार वाजता शपथ विधी होता. तेव्हा हे महाशय रुसून बसलेले. शपथविधीला ते दिसले नाहीत तेव्हा चौकशी झाली. सरकारतर्फे सांगण्यात आले ते दिल्लीत आलेलेच नाहीत,' बातमीदारांनी तपास लावला तेव्हा ओरॉं साहेब म्हणाले, 'हे उपमंत्रीपद स्वीकारायचे की नाही याचा मला विचार केला पाहिजे. मी बाईंना पत्र लिहिणार आहे यासंबंधात.' ◻

# हवा पालटू लागली

दिल्ली महापालिकेच्या निवडणूक कौलाबद्दल राजधानीतील मतदारांचे कौतुक केलेच पाहिजे. ते अशासाठी की दोनच महिन्यापूर्वी लोकसभा निवडणुकीत या मतदारांनी जनसंघाला पार जमीनदोस्त केले होते. त्यावेळी केंद्र सरकार भक्कम असावे वगैरे इंदिराजींचे म्हणणे मान्य करून राजधानीने सत्तारूढ काँग्रेसला सर्वच्या सर्व जागा दिल्या. पण यावेळी जनसंघाचा 'शुद्ध समाजवादासाठी करायचे नाही आहे तर डास व मच्छरांविरुद्ध करायचे आहे' हा अभिनिवेश नागरिकांना पसंत पडला.

जनसंघाने गेल्या चार वर्षांत शहर सुधारणेसाठी केलेल्या परिश्रमाची ही पावती असो किंवा त्या आधी काँग्रेसने न केलेल्या धडपडी विरुद्ध व या पक्षाच्या अधिकाऱ्यांच्या भ्रष्टाचाराविरुद्धची चीड यातून व्यक्त झालेली असो, नागरिकांनी राष्ट्रीय व स्थानिक प्रश्नांचा विचार अलग अलग केला हे निश्चित कौतुकास्पद आहे. देशाच्या राजधानीत लोकशाही रुजली आहे. हा विचार सुखावह आहे.

काँग्रेसने शंभर उमेदवार उभे करूनही फक्त ४२ च निवडून आले याचा विचार पुढल्या वर्षीच्या मेट्रोपोलिटन कौन्सिलच्या निवडणुकी आधी या पक्षाला करावा लागेल. अगदी आरंभापासून म्हणजे तिकीट देण्यापासूनच काँग्रेसमधील वादावादी उघड्यावर आली होती. लोकसभा निवडणुकीत मेहनत करणाऱ्यांनी त्या जोरावर तिकीट मागितले होते. तर जुन्या कार्यकर्त्यांनी आपण आयुष्यभर खपतो आहोत, मग आम्हाला डावलून या तरुण पोरांना तिकीट देण्यात कुठला न्याय अशी विचारणा केली होती. उमेदवारांची यादी जाहीर झाल्यानंतर दुसऱ्याच दिवशी अनेक तरुणांनी व वृद्धांनी पंतप्रधानांच्या घरासमोर निदर्शने केली. मग आपल्याच उमेदवाराविरुद्ध प्रचार सुरू झाला.

या उलट एका खासदाराच्या इच्छेविरुद्ध दिल्ली काँग्रेसने एका विद्यार्थी संघटनेच्या नेत्याला उभे केले तेव्हा खासदार म्हणाले, 'पाहून घेऊ' जनसंघाने साहजिकच अशा परिस्थितीचा फायदा घेतला.

या निवडणुकीत इंदिरा गांधींनी एकही प्रचार सभा घेतली नाही. उलट जनसंघाच्या अटलबिहारींपासून अगदी छोट्या कार्यकर्त्याने कंबर कसली होती.

या निकालामुळे—५१ जागा मिळून बहुमत पटकाविल्यामुळे—आमच्या 'अदृश्यशाई'चा दावा खरा ठरतो असे मधोक दुसऱ्या दिवशी म्हणाले. त्यांचे म्हणणे, 'मतमोजणी दुसऱ्याच दिवशी केल्यामुळे तसा प्रकार यावेळी झाला नाही. शिवाय अफरातफर, पळवापळवही नव्हती.' कुणास ठाऊक !

पृष्ठ ६३ वर

# हे कलकत्ता

सौ. तारा पंडित

## निवडणुकांच्या थोडे अगोदर

निवडणुकांबाबत वाटली जाणारी पत्रके खरे म्हणजे वाचण्यासाठी असतात. पण बहुधा कोणीच ती वाचत नाहीत. ह्यात विशेष आश्चर्य वाटण्यासारखे काही नाही. कारण ती सारी पोकळ आश्वासनांनी भरलेली असतात. याशिवाय, जे कोणी ती वाचून काढतात ते म्हणतात की त्यात व्यक्त झालेली वेगवेगळ्या पक्षांची अभिवचने अगदी एकसारखीच असतात. त्यात फरक नसतोच. कारण त्यांची ध्येये व ती साध्य करण्यासाठी सुचविलेले मार्ग-सारे काही एकच असते. असे असेल तर मग आपला व्यक्तिगत संदेश जनसाधारणापर्यंत उमेदवाराने कसा पोचवावा?... पूर्वी ठिकठिकाणी भित्तीपत्रके चिकटवण्याची प्रथा होती. पण या निवडणुकांच्या वेळी त्या मार्गाचे विशेष अवलंबन झालेच नाही. कारण लोकांनी ती वाचण्याचे बाबतीत अनास्थाच दर्शवली. शिवाय त्या पत्रकात (Posters) जागा मर्यादित असल्याकारणाने विस्तृत मजकूरही देता येणे शक्य नसते. अशा परिस्थितीत काय करावे हा प्रश्न साहजिकच उत्पन्न झाला. ठिकठिकाणी सभा घेणेच इष्ट हा. योग्य उपायही लागलीच अंमलात आणला गेला. अशी एके ठिकाणी एक सभा चालली होती. गेल्या वेळी निवडून आलेले एक गृहस्थ या निवडणुकांचे वेळी उमेदवार म्हणून उभे होते. त्यांचे भाषण सुरू होते. ते ऐकण्यासाठी गर्दी करून जमलेल्या लोकांना हे महाशय म्हणाले–

"लोकहो, गेल्या वेळी तुम्ही मला निवडून दिलेत हे खरे; पण मी तुमच्यासाठी काहीच करू शकलो नाही. कारण मी माझ्या स्वतःच्या सोयी करून घेण्यात गढलो होतो. पण आता मला हवे होते ते सर्व काही मी मिळवले असून यानंतर तुमच्या सुखसोयींकडे लक्ष देण्यास मी भरपूर वेळ व शक्ती खर्च करू शकेन. तेव्हा, आपण सर्वांनी मलाच आपले मत द्यावे. जर तुम्ही माझ्याऐवजी दुसऱ्या नव्या उमेदवाराला निवडून दिलेत तर तोही असाच पुढची पाच वर्षे स्वतःचीच देखभाल करण्यात खर्च करील आणि तुमच्यावर पुन्हा तिष्ठत बसण्याची पाळी येईल."

## भेटीगाठी

निवडणुकांच्या अगोदर शहरात आणि गावात राहणाऱ्या लोकांच्या भेटी घेऊन त्यांच्या मनाचा अंदाज बांधणे म्हणजे महाकर्मकठीण! सर्व सुशिक्षित लोक चांगलेच बिलंदर असतात. आपण कोणत्या पार्टीला मत देणार एवढा मुद्दा वगळून ते तुमच्याशी सर्व काही बोलतील. अर्थात प्रत्येकाचे मतदान ही एक खाजगी बाब असल्याकारणाने निवडणुका झाल्यानंतरही असा प्रश्न विचारणेच योग्य नसते. वार्ताहरांनी देखील! पण याच वेळी जास्तीत जास्त भेटीगाठी घेऊन निवडणुकां॰ पूर्वी लोकमत अजमावणे हेही काम वार्ताहराच्या दृष्टीने तेवढेच महत्त्वाचे असते. हा असाच एक इंटरव्ह्यू

प्रश्न : या वर्षी पीकपाणी कसं काय झालंय् हो?

उत्तर : बरं आहे...म्हणजे खराब नाही...पण विशेष चांगलही नाही.

प्र. : तांदुळाचा भाव काय आहे या भागात?

उ. : असेल १ रु ४० पैसे.

प्र. : या विभागातून कोणत्या पार्टीचे सदस्य उभे आहेत?

उ. : या विभागातून?...थांबा...तुम्ही कोणत्या पार्टीचे आहात ते सांगा अगोदर.

प्र. अहो, मी कोणत्याच पार्टीचा नाही. कलकत्त्याहून आलोय...इथलं वातावरण—म्हणजे निवणुकांच्या बाबतीतलं—अजमावण्यासाठी...गेल्या वेळी इथून कोण निवडून आलं हो?

उ. : सिंह : (किंवा बैलजोडी, किंवा हातोडा...कोयता...इ...इ. )

प्र. : आणि ह्यावेळी कोण निवडून येईल असं तुम्हाला वाटतं?

उ. : भगवान् जाणे! अहो, बाकीचे लोक कोणाला मत देणार हे मला माहीत का आहे?

प्र. : अर्थात तुम्हाला माहीत नसणारच. पण कोणती पार्टी निवडून येण्याची शक्यता आहे हे तर तुम्ही सांगू शकाल?

उ. : होय, अगदी बरोबर. चरखा घेऊन बसलेली स्त्री...तिला मतं मिळणारच. शिवाय गाय नि बछडा...ही पार्टी तर स्ट्रॉंग आहे. पण हातोडा-कोयत्याकडेही अगदीच दुर्लक्ष करून चालायचं नाही. शिवाय सिंह...तो देखील आहेच की!

प्र. : म्हणजे...या चार पार्टीपैकी एखादी निवडून येऊ शकते, असंच ना?

उ. : वा, राव! एवढ्याने झालंय का कधी? याशिवाय आणखी अनेक पक्ष आहेत की...आपला तो हा...

प्र. : बरं, बरं. असू देत. पण इथे चुरस कोणत्या कोणत्या पक्षांमध्ये होणार?

उ. : हे मात्र सांगणं कठीण आहे हं. मी तर तुम्हाला मघाच सांगितलं की गाय

नि बछडा आहे, हातोडा कोयता...

प्र. हो हो हो ! ते सारं तुम्ही मला अगोदरच सांगितलंत...

उ. : आस्सं ! पण काय हो मिस्टर, तुम्हाला स्वतःला काय वाटतं हो ?

प्र : मला काय वाटतं ?...हं ! मला वाटतं, मी चुकीचा धंदा स्वीकारलाय् !'

## नवा अध्याय

पश्चिम बंगालमध्ये श्री. अजयकुमार मुखर्जींच्या नेतृत्वाखाली नवे सरकार स्थापन झाले. श्री. मुखर्जींनी मुख्यमंत्री म्हणून रायटर्स बिल्डिंगमध्ये पुन्हा एकदा नव्याने प्रवेश केला. कामाची सूत्रें हाती घेण्याचे आदले दिवशी सायंकाळी त्यांनी रेडिओवर भाषण केले. ते म्हणाले, 'निवडून आलेल्या नव्या सरकारसमोर पहिली व महत्त्वाची कामगिरी म्हणजे हिंसक कृत्यांची आग तात्कडतोब विझवणे ही होय. समस्यांनी परिपूर्ण असलेल्या ह्या राज्यात अनेक प्रश्न सोडवायचे आहेत हे खरे असले तरी सर्वात महत्त्वाचे काम म्हणजे संपूर्ण राज्यात शांततेचे वातावरण निर्माण करणे हेच होय. तें झाले की इतर अनेक प्रश्न सोडविण्यास सुविधा प्राप्त होईल.'

नवे सरकार जनतेच्या आशा किती प्रमाणात पूर्ण करतं ते आता बघायचे !

## मंत्रिमंडळातील सर्वात तरुण सदस्य

पश्चिम बंगालच्या मंत्रिमंडळात जास्तीत जास्त सभासद तरुण पिढीतले आहेत. त्यांची वयोमर्यादा ३० ते ४० च्या दरम्यान आहे.

श्री. विजय सिंग नाहर (डेप्युटी चिफ मिनिस्टर) यांनी वृत्तपत्रकारांजवळ ह्या गोष्टीचा उल्लेख केला तेव्हा पी. डब्ल्यू. डी. मिनिस्टर श्री. संतोषकुमार रॉय यांनी 'काहीजण वीसवर्षाखालचे देखील आहेत' अशी पुस्ती जोडली.

लागलीच मुख्यमंत्री अजयकुमार मुखर्जी म्हणाले—'तुम्ही सारेजण तरुण आहात तर ह्या म्हाताऱ्याला आपल्यात का म्हणून घेतलेत ?'

यावर श्री. नाहर उत्तरले—'नाही, नाही अजयदा ! तुम्ही तर सर्वात तरुण सभासद आहात. अजून तुमचं लग्न देखील झालेल नाही !'

मग अर्थमंत्री श्री. तरुण कांति घोष ह्यांनीही ह्या निवेदनात भाग घेतला. ते म्हणाले—'काय विचित्र प्रघात पडला आहे बघा. एकदा माणसाचं लग्न झालं की तो काही पश्चिम बंगालचा मुख्यमंत्री होऊं शकत नाही.'

## निरोप-प्रतिनिरोप

बांगला देशाच्या कोमिल्ला जिल्ह्यात पश्चिम पाकिस्तानचे सैन्य व मुक्तिवाहिनी यांच्यात निरोपाची गमतीदार देवाण-घेवाण झाली. पाकिस्तानी सैन्याने पाठवलेल्या काही दूतांना मुक्तिफौजेने कोमिल्ला सीमेच्या जवळपासच्या प्रदेशात पकडले असताना त्यांच्याजवळ तातडीच्या मागणीचे पत्र सापडले. हे पत्र सेनाधिकाऱ्याने एका विख्यात व्यापाऱ्याला लिहिलेले होते व त्यात ताबडतोब खाद्यपदार्थ पुरवण्याविषयी मागणी केलेली होती. मुक्तिफौजेनेच त्या पत्राचे उत्तर देऊन दूतांना परत पाठविले. त्या उत्तरात लिहिले होते–' पाकिस्तानी सैन्याने बांगला देशाचे अनेक लोक मारून टाकले आहेत. पण स्वतः जगण्याची त्यांना अजूनही इच्छा असेल तर त्यांनी आता प्रेते फाडून खाण्यास सुरुवात करावी.'

## बंगाली मन म्हणते–

' ब्रिटिशसत्तेविरुद्ध बंड पुकारण्यात आले होते तेव्हा देशबंधु चित्तरंजन दास एकदा म्हणाले, " देशप्रेम हा गुन्हा ठरत असेल, तर मी एक गुन्हेगार आहे म्हणून समजावे." आता स्वतंत्र राष्ट्रांनीच विचार करून ठरवावे बांगला देशाचे लोक गुन्हेगार कसे आहेत ते ! '

' काश्मीर हा भारताचा विभाग आहे असे ठरले तेव्हा पाकिस्तानने आमच्या घरगुती भानगडित शस्त्रास्त्रे व सैन्य आणून लुडबुड केली होती. शिवाय ' काश्मीरच्या लोकांनीच आमची मदत मागितली ' असा वर खुलासाही केला होता. आज मुजिबूर आमची मदत मागताहेत, आम्ही ती का न करावी ? '

' कुठल्याही जुलमी राजाप्रमाणे याह्याखानांना भिंतीवरील घोषणांची अक्षरे सहन झाली नाहीत. इतिहासात अशी उदाहरणे भरपूर आहेत ज्यांत सत्तांध राज्यकर्त्यांनी प्रजाजनांच्या भावनांचा चक्काचूर करून टाकल्याचे दाखले आहेत.'

माणसाप्रमाणे राष्ट्राच्या जीवनात देखील असे काही महत्त्वाचे क्षण येतात ज्यावेळी सारी बंधने तोडून आणि विद्वत्ता बाजूला ठेवन एखादे पवित्र कर्तव्य पार पाडणे आवश्यक असते. असा क्षण आपल्यासमोर आज येऊन ठेपला आहे. हृदयात देशभक्तिची ज्योत तेवत ठेवून शत्रुच्या तोफांना वीरासारखे सामोरे जात असलेल्या बांगला देशाच्या जनतेला आपण मदत करण्यास असमर्थ ठरलो किंवा अनिच्छा दर्शविली तर त्यामुळे लागलेला कलंक आपण कधीही धुवून टाकू शकणार नाही.'

□ □ □

# विदेश वार्ता

**सु. ल. सोमण**

## मध्य पूर्व : रॉजर्स मोहीम

अमेरिकेचे परराष्ट्रमंत्री विल्यम रॉजर्स मध्यपूर्वेत येऊन थडकले आहेत. तिथे ते इस्त्रायलसह पाच राष्ट्रांना भेटी देणार आहेत. शांतता प्रस्थापनेचा गुंता सोडवण्याच्या प्रयत्नांना उजाळा देणार आहेत. ह्या प्रश्नांशी निगडीत असलेल्या मध्य पूर्वेतल्या राष्ट्रांनी रॉजर्स स्वागताची तयारी चालवली असली तरी, या राष्ट्रांतल्या डाव्या गटांनी रॉजर्स भेटीचा धिक्कार केला आहे. शासकीय आदेशांना न जुमानता, त्यांची रॉजर्स विरोधी निदर्शने चालू आहेत. ही निदर्शने बहुसंख्य अरब राष्ट्रांच्या मनातली अमेरिकन हेतुविषयीची साशंकता, त्यांची काटेकोर भूमिका—ह्यामुळे रॉजर्स भेटीच्या उपयुक्ततेसंबंधी अनेकांच्या मनात शंका आहेत. खुद्द रॉजर्स ह्यांनाहि ही कल्पना आहे. म्हणूनच मध्यपूर्वेकडे प्रयाण करताना ते म्हणाले, "मी काही फार मोठी जादू करून मध्यपूर्वेचा प्रश्न सोडवू शकेन असं मुळीच नाही तशी काही नाट्यपूर्ण फलश्रुति अपेक्षितही नाही. पण मी आशावादी आहे. सुएझ कालवा खुला करण्याच्या दृष्टीने काही समझौता मी घडवून आणू शकेन असं मला वाटतं...एकूण प्रश्नाची उकल व्हायच्या दृष्टीने काही पाऊल पुढे पडू शकल तरी मी समाधान मानेन..."

पण विल्यम रॉजर्स काहीसे नशीबवान दिसतात खरे. त्यांच्या मध्य पूर्वेतल्या आगमनाच्या सुमारासच नेमकी ईजिप्तच्या उपराष्ट्राध्यक्षांच्या बडतर्फीची घोषणा झाली आहे. ही घोषणा जरी संपूर्ण अनपेक्षित नव्हती तरी, ज्या पद्धतीने ही घोषणा झाली आहे त्यावरून असं अनुमान काढायला हरकत नाही की नव्या अरब सघराज्याची निर्मिती सुरळीत व्हावी, रॉजर्स शिष्टाई होऊ शकावी अशाच हेतूंनी ही घोषणा झाली आहे. ईजिप्तचे उपाध्यक्ष अली साब्री ह्यांची अशी बडतर्फी दुसऱ्यांदा होत आहे. अध्यक्ष नासेर ह्यांनीहि श्री. अली साब्री ह्यांना एकदा उपाध्यक्षपदावरून अर्धचंद्र दिला होता. वास्तविक अली साब्री हे पै. नासेर ह्यांचा उजवा हात समजले जात. राष्ट्रीय असेंब्ली, पक्षीय बैठक ह्यातहि अली साब्री ह्यांच्या गटाचा जोर आहे.

परंतु रशियाकडचा आत्यंतिक कल व अतिडावी मतं ह्यामुळे राष्ट्रीय नेतृत्व त्यांच्या-वर नाराज आढळते. अरब फेडरेशन, तेल अबीब बरोबरची शस्त्रसंधी ह्यांना त्यांचा कडक विरोध असतो. साहजिकच त्यांच्या अनुपस्थितीमुळे रॉजर्स ह्यांचं काम थोडं सोपं होईल असं अरब राजनैतिक वर्तुळात मानलं जात आहे. ही कदाचित ईजिप्तच्या राजकारणात घुसलेल्या 'डाव्यां'च्या उचलबांगडीचीहि सुरवात असावी असंही मत काही पश्चिमी राजनितिज्ञांनी वर्तविल आहे. त्यांच्या मते अध्यक्ष सादत अधीक उदार मतवादी असून, ईजिप्तमधली डावी विचारसरणी हलके हलके मागे पडूं लागेल. लिबियासह, अरब-फेडरेशनकडे ही मंडळी त्या दृष्टींने बोट दाखवतात. (लिबियाचे कर्नल गढ्ढाफी हे कट्टर कम्युनिस्ट विरोधक गणले जातात.)

गेल्या काही दिवसातली तेल अबीब व कैरो येथून प्रसिद्ध होणारी निवेदन पाहू गेल्यास गुन्नार जारिंग व मिशन देवो की रॉजर्स फेरी घडो, ह्या दोन राष्ट्रांमध्ये समझौता होईल ह्य विषयी कुणीही आशावाद प्रगट करण्यास धजावला नसता. मे. दिनाच्या सभांस्ह, प्रत्येक वेळी इस्त्रायलच्या संपूर्ण माघारीच्या मागणीवर सादत ह्यांनी जोर दिला. त्यासाठी इस्त्रायली प्रश्न शस्त्रबळाने सोडवायचीही तयारी त्यांनी वेळोवेळी बोलून दाखवली. तर, शर्म-एल-शेख, एराथची पट्टी आणि जेरु-सलेम ह्यांवरचा ताबा कदापिही सोडणार नाही असं पंतप्रधान श्रीमती गोल्डा मायर वेळोवेळी जाहीर करत असतात. १९६७ च्या युद्धानंतर इस्त्रायलने सुएझ कालव्याची नाकेबंदी केली. सुएझच्या पूर्व किनाऱ्यावर अरब सैनिकांची गस्त राहावी ह्या अरब मागणीचा साधा विचार सुद्धा करायची तयारी इस्त्रायलची नाही. ह्याच साऱ्या घोटाळ्यांमध्ये, सुमारे तीन महिन्यांपूर्वी सुरू झालेल्या गुन्नार जारिंग व मिशनच्या हालचाली मंदावून गेल्या आणि म्हणूनच, ह्या प्रश्नांवर नजिकच्या भविष्यांत संवाद घडून येईल ह्याची शाश्वती वाटत नव्हती. परंतु ताज्या घडा-


हंसा वाडकर यांचे आत्मकथन

सांगत्ये ऐका
सांगत्ये ऐका

मूल्य आठ रुपये
राजहंस प्रकाशन

मोडीमुळे परिस्थितीत निश्चित बदल झाला आहे. मे दिनाच्या ताज्या भाषणात बोलताना अध्यक्ष सादत ह्यांनी शस्त्रसंधीत वाढ स्वीकारण्याची तयारी दाखवली. काही अटी घालून का होईना, पण दाखवलेली ही तयारीही बरीच बोलकी आहे. त्यामागची कारणं मग काही का असेनात !

परराष्ट्रमंत्री विल्यम रॉजर्स ही भेट, प्रामुख्यानं सुएझ कालवा आंतरराष्ट्रीय वहातुकीसाठी खुला करण्याच्या दृष्टीने आहे. ह्याला साहजिकच इस्त्रायलचा विरोध आहे. सुएझ बंदीमुळे ईजिप्तवरील आर्थिक दडपण वाढत राहतं हे पहिलं कारण. दुसरं कारण म्हणजे, एलाथ-अॅशडॉड पाईप लाईन ! सुएझ बंदीनंतर ह्या तेल लाईनमुळे इस्त्रायलचा बराच फायदा झाला आहे; होतो आहे ! परंतु इस्त्रायलच्या विरोधाला न जुमानताही अमेरिका ह्या तडजोडीसाठी काही प्रयत्न करीत आहे, त्यालाही तशीच कारणं आहेत. सुएझ बंदीनंतर, अमेरिका व अन्य पाश्चात्य राष्ट्रांनी प्रचंड पाईप लाईन्स टाकून, मोठमोठाले टँकर्स उपयोगात आणून, केप ऑफ गुडहोपचा वळसा घेऊनही तेल मिळवलं. तेही सुएझद्वारा येणाऱ्या तेलाच्या किमती एवढ्याच किमतीत ! सहजिकच, रशियाकडे झुकू पाहणाऱ्या ईजिप्तला धडा शिकवण्याच्या दृष्टीने सुएझ बंदी ह्या राष्ट्रांनी जवळजवळ पुरस्कारलीच. परंतु त्यांनी पुरस्कारलेली ही नाकेबंदी आता त्यांनाच त्रासदायक ठरू पाहात आहे. लिबिया, सिरिया आदि राष्ट्रांनी तेल कंपन्यावर लादलेली नवनवीन बंधनं, सिरियातली पाईपलाईन दुरुस्त करण्यासाठी सिरियन शासनाने केलेली खळखळ—ह्या साऱ्या कारणांनी पाश्चात्य राष्ट्रांना तेलासाठी अलिकडे जबर किमत मोजावी लागत आहे. साहजिकच त्यांचे डोळे आता सुएझकडे वळत आहेत.

सुएझ खुला होण्यात रशियाचेही फायदा आहे. हिंदी महासागरातनं येद वाहतुकीच्या दृष्टीनं, आरमारी हालचालींच्या दृष्टीने रशियाला ते सोयीचे ठरणार आहे. म्हणूनच, अली साब्रीसारखा मित्र उडवला गेल्यामुळे रशिया काणाडोळा करू शकत आहे. अली साब्रीच्या पदच्युतीमुळे रॉजर्सबरोबरची बोलणी अधिक सौहार्दपूर्ण होतील असं म्हणूनच रशियन्स म्हणतात !

राजकीय दृष्ट्याही प्रत्यक्ष संघर्ष दोन्ही बड्यांना नको आहे. तणाव राहिल्यास हवा; पण ठिणगी उडायला नको. तणावातही, जमल्यास आपलं दान टाकून बघावं ही दोन्ही बड्यांची नीति ! ईजिप्तही सध्या अंतर्गत बाबीत गुंतला आहे. अंतर्गत आर्थिक स्थैर्य, अरब फेडरेशन वगैरे ! आणि इस्त्रायललाही संघर्ष ओढवून घ्यायचा नाही आहे तो त्यांच्या स्थैर्यासाठी !! साहजिकच रॉजर्स-भेटीतून, दोन्ही बड्यांना आता आवश्यक वाटू लागलेल्या सुएझ खुला होण्याच्या अलिकडे काही मोठं पाऊल पडेल अशी आशा बाळगणं व्यर्थ !

□ □ □

# कवी व नाटककारांना बँकांनी कर्ज देऊ नये !

सुभाष सोनवण

राष्ट्रीयकृत बँकांचे प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यांची नवी दिल्लीमध्ये एप्रिलअखेर ३ दिवसांची बैठक झाली. या बँकांच्या कामगिरीचे मूल्यमापन सदर बैठकीत करण्यात आले. याखेरीज एक 'क्रांतिकारक' निर्णय या बैठकीत घेण्यात आला. तो म्हणजे, 'कवी, नाटककार या प्रतिभावंत व सर्जनशील साहित्यिक वर्गासही बँकांनी कर्ज द्यायचे'!

झालं, ताबडतोब पत्रकार साहित्यिकांनी (की साहित्यिक पत्रकारांनी ? हे ज्याचे त्याने स्वतःच ठरविलेले बरे !) आशाळभूतपणे व मोठ्या उत्साहाने वर्तमानपत्रातून या निर्णयाच्या चौकटी झळकविल्या. 'पुरोगामी सरकारही भलतच रसिक असू शकतं तर !' असं म्हणत अग्रेसर साहित्यिकांच्या अर्धांगिनींनी इंदिराजींच्या सरकारचे कौतुक करण्यास सुरूवातही केली आहे असं म्हणतात.

अर्थकारणाची योग्य तशी व योग्य तेवढी दखल न घेणाऱ्या मराठी वृत्तपत्रांनी या निर्णयासंबधी काही लिहिले नाही हे त्यांच्या 'परंपरे'त फिट्ट बसणारे आहे. मराठीत सर्वात जास्त खप असलेल्या दैनिकाच्या दिल्लीच्या प्रतिनिधीने यासंबंधी आपल्या वार्तापत्रात लिहिण्याचे अफलातून धाडस केले. मत्र्यांची रसिकता, पैसा, सोने, श्रीमंत कारखाना या शीर्षकाच्या नाटकाची व इतर साहित्य कृतींच्या नावांची पखरण करून आर्थिक प्रश्नांवर बालिश व हास्यास्पद 'संशयरत्नमाला' या महाभागांनी लिहिली आहे. आपलं सवंग विशिष्ट राजकीय तत्त्वज्ञान पुढ रेटण्यासाठी अर्थकारणाला सत्ताधारी पक्षाने वेठीला धरले आहेच. नी त्यानुसार राष्ट्रीयकृत बँकांच्या प्रमुख कार्यकारी अधिकाऱ्यांनी वरील निर्णय घेतला आहे. तेव्हा अर्थकारणावर 'अत्याचार' करण्यासाठी साहित्यिक असलेली (व नसलेलिही) पत्रकार मंडळी उतावीळ झाली असल्यास नवल वाटण्याचे कारण नाही.

मी स्वतः एक छोटा लब्धित लेखक, कवी (हो, दुसऱ्याने जसे हिणवण्यापूर्वी स्वतःच म्हटलेले बरे !) व रसिक आहे. तरीही माझा या निर्णयास प्रखर विरोध आहे. नी यात कोणतीही विसंगती नाही. कारण मी अर्थशास्त्राचाही अभ्यासू आहे. अर्थकारणात विवेक, यथार्थवाद व वस्तुनिष्ठ दृष्टिकोण यास अधिक महत्त्व असावे असं मानणाऱ्यांपैकी मी एक आहे.

आजच्या तथाकथित पुरोगामी वातावरणात मी वेगळा सूर काढतो, वेगळा विचार मांडतो म्हणून तमाम कविवृंद व नाटककार यांचा राग उफाळन येण्याचा संभव आहे. पण त्यांच्या रागलोभापेक्षा कितीतरी पटीने अधिक मोलाचे आहे ते पददलित-दिनदुबळ्या जनतेचे हीत व देशाच्या अर्थव्यवस्थेचे हीत !

## उत्पादक योजनांवरच भर द्या

बेकारीच्या समस्येकडे आतापर्यंत केंद्र सरकारने भयानक दुर्लक्ष केले. देशात पूर्ण वेळ बेकार व काही काळ बेकार लोक किती आहेत याची विश्वसनीय आकडेवारी २० वर्षांच्या नियोजनानंतरही उपलब्ध नाही. परंतु ४ ते ५ कोटींच्या दरम्यान बेकार लोकांची संख्या आहे असे सर्वसाधारणतः मानले जाते.

बेकारीची समस्या पहिल्या योजनेच्या सुरुवातीपासूनच आहे. पण या समस्येचे गांभीर्य केंद्र सरकारच्या लक्षात अगदी अलीकडेच आले. कुंभकर्णी झोप घ्यावी नी मग खडबडून उठल्यावर बावचळून जावे अशी काहीशी अवस्था केंद्र सरकारची झाली आहे.

कोणत्याही समस्येचे गांभीर्य उशीरा लक्षात आले म्हणून फार गडबडून जाण्याचे कारण नाही. धीरगंभीरपणे त्या समस्येच्या सर्व बाजूंचा नीट विचार करून मगच दमदार पाऊल उचलणे हाच समस्या सोडविण्याचा खरा मार्ग असतो.

या देशातील बेकारीची समस्या ही दोन-पाच वर्षांत सुटणारी समस्या नाही. तसेच दुष्काळी कामासारखी कामे सुरू करून बेकारांना जास्तीत जास्त काळ काम देता येणार नाही. नी तसे शक्य झाले वा केले तरी ते श्रेयस्कर नाही. उत्पादन वाढेल, त्याद्वारे संपत्ती वाढेल, त्यामुळे भांडवल संचय वाढेल व त्यातून अधिकाधिक लोकांना रोजगार देणे शक्य होईल अशाच उत्पादक योजना सरकारने सुरू केल्या पाहिजेत.

राजकारणात व निरनिराळ्या पक्षांच्या राजवटीत निरनिराळ्या कल्पनांचे अर्थ बदलतात. परंतु अर्थकारणात तसे नाही. जगाच्या कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेत उत्पादक क्षेत्रांविषयीच्या कल्पना सारख्याच आहेत. परंतु कवींची काव्यरचना व नाटककारांची नाटके हे उत्पादक प्रयत्न असल्याचा नवा अर्थशास्त्रीय शोध केंद्रीय अर्थखात्याच्या बँकींग विभागाचे चिटणीस श्री. ए. बक्षी यांनी लावला आहे. बँकेच्या शाखा व्यवस्थापकाने अशी 'अभिनव व काल्पनिक क्षेत्रे' धुंडाळून काढावी असेही या महाशयांचे म्हणणे आहे. दर महिन्यास असे एक कर्ज द्यावे असेही शाखा व्यवस्थापकांना सांगण्यात आले आहे.

अर्थशास्त्रातील उत्पादक प्रयत्नांच्या कल्पनेत काव्यसंग्रह व नाटके यांना बसविण्याचा महाभयानक खटाटोप करण्यात आला आहे. तसेच भारतासारख्या विकसनशील देशात अशा कामासाठी कर्ज देणे हे केव्हाही अग्रक्रमात बसूच शकणार नाही. आज तरी ही सुशिक्षित मध्यम व श्रीमंत वर्गाची एक चैनीची सुखासीन बाब आहे. देशात मुळात भांडवल संचय, बचत ही गरजेच्या मानाने फार कमी आहे. नी समस्या बऱ्याच व बिकट आहेत. तेव्हा उपलब्ध साधनसामग्रीचा वापर हा मुलभूत गरजांच्या अग्रक्रमानुसारच व्हावा.

खेड्यांमधील सुमारे २० टक्के सधन शेतकऱ्यांचे जीवनमान उंचावलेले आहे. आणि सर्व विकास योजनांचा बव्हंशी फायदा या सधन शेतकऱ्यानेच उपटला आहे याबाबत सर्वत्र एकमत आढळते.

२२ मे १९७१

## भूहीनांची सत्यपरिस्थिती

महाराष्ट्र सरकारने १९६१ मध्ये स्व. धनंजयराव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या अभ्यास गटाच्या मते, भूहीन शेतमजुरांचे दरडोई उत्पन्न हे राज्यातील लोकांच्या दरडोई उत्पन्नाच्या सरासरीच्या फक्त २८ टक्के एवढे आहे. अधिकृत आकडेवारीनुसार, त्यावेळी दरडोई उत्पन्न ३९२ रु. होते. याचाच अर्थ असा की, राज्यांतील भूहीन शेतमजुराचे वार्षिक दरडोई उत्पन्न फक्त १०९ रु. ७६ पैसे एवढे होते. सरासरी दिवसाला ३० पैसे उत्पन्न असणाऱ्या भूहीन शेतमजुरांच्या परिस्थितीत गेल्या १० वर्षांत विशेष बदल झाला आहे असे म्हणणे निश्चितच धाष्टर्याचे ठरेल.

अनुसूचित जाती-जमाती, हरिजन-गिरिजन हा पददलीत वर्ग व इतर दीन-दुबळ्या जातींच्या आर्थिक आकांक्षा जागृत झाल्या आहेत. तसेच देशातील हजारो खेड्यांना अद्याप पिण्याच्या पाण्याचा पुरवठा, चांगल्या सडका व पक्की घरे उपलब्ध नाहीत. ह्या प्रचंड समस्या आहेत व त्यासाठी अर्थसहाय्यही बरेच लागणार आहे. त्यामुळे ह्या सुखसोयी सर्व लोकांना पुरविणे नजिकच्या भविष्यकाळात शक्य नाही. असे असले तरी केंद्र सरकारला लोकांच्या जागृत आर्थिक आकांक्षा लक्षात घेऊन, लोकांच्या मूलभूत गरजा पूर्ण करण्याच्या उत्पादक कार्यासाठी अधिक पैसा खर्च करून अधिक रोजगार निर्माण करता येईल. त्यामुळे संभाव्य लोकक्षोभ व असंतोष टाळता येईल.

तेव्हा रोजगाराच्या योजना निर्माण करताना फालतू कल्पना विलासास उगाच वाव देवू नये. कवी-नाटककारांना कर्जे दिल्यामुळे त्यांची भलाई मिळेल, पण प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रोजगार निर्मितीस त्यामुळे विशेष हातभार लागणार नाही.

पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी ह्या या समस्येविषयी निश्चितच गंभीर झाल्या आहेत. रोजगार योजनेसाठी केंद्राने दिलेल्या रकमेचा पुरेपूर उपयोग न करण्याचा करटेपणा राज्य सरकारांनी गेल्या वर्षी केला. त्याबद्दल इंदिराजींनी राज्यांच्या प्रमुख चिटणीसांच्या बैठकीत त्यांचे कान उपटले हे ठीकच झाले. इंदिराजी, ह्या थातुरमातुर व उगाच सवंग निर्णयाची अंमलबजावणी रोखा. नाहीतर ह्या अभिनव व काल्पनिक क्षेत्रे धुंडाळण्याच्या निर्णयाची धडक अंमलबजावणी झाली की अग्रक्रम दिलेल्या कार्यक्रमासाठी साधनसामग्री तोकडी पडेल. त्यामुळे लोकांचा असंतोष ओढवून घ्याल व वेड्या महंमदाच्या, थोड्या प्रमाणात का होईना, आपण वारसदार ठरल्या अशीही आपली संभावना होईल. हे असे होऊ नये यासाठी सच्चे पुरोगामी राजकारणच आपण पुढे रेटा. लोकांचा असंतोष टाळण्यासाठी असे दिखाऊ व थातुरमातुर निर्णय अंमलात आणू नका. गरजांची क्रमवारी लक्षात घेऊन उपलब्ध साधनसंपत्तीचा जास्तीत जास्त चांगला वापर करण्यासाठी वस्तुनिष्ठ अर्थकारणाचीच कास धरायला हवी.

□ □ □

# काळ कब्जा घेत आहे !

शतपावली

रवींद्र पिंगे

एखाद्याची अब्रू लुटण्याची काळाची शक्ती केवळ अमोघ आहे ! ज्या मी–मी म्हणणाऱ्यांनी एक काळ गाजवून सोडला, त्या बहाद्दरांची पाच पंचवीस ऋतू पालटल्यावर नावनिशाणीही शिल्लक उरू न देण्याची अघोरी चेष्टा काळ किती लिलया करतो ! हे सारं पांडित्य आताच सुचण्याचं कारण म्हणजे 'टाईम' साप्ताहिकातला Milestones हा स्तंभ मी गेली बरीच वर्षे वाचीत आहे. दरवेळी ऐंशी-पंचाऐंशी वर्षे ओलांडलेला कुणीतरी रथी-महारथी आपला आवतार आवरता घेतो नि त्याच्या निधनाबद्दलचा तो मजकूर वाचून मग वाचकांना कळतं की अमुक अमुक असामी मरणाच्या आधल्या क्षणापर्यंत पृथ्वीच्या कुठल्यातरी अंधेऱ्या कानाकोपऱ्यात मूकपणे दिवस लोटीत होतो. कुणी मूकपटांच्या जमान्यातला सम्राट असतो तर कुणी रणांगण गाजवलेला योद्धा असतो. पदव्या आणि पदकांची ज्याच्यावर एकेकाळी खैरात झालेली असते, अशा एखाद्या जुन्या जमान्यातल्या संगीतरचनाकाराच्या लौकिकाचा कालप्रवाहात निव्वळ भुगा-भुगा झालेला असतो. केवळ जेटगतीने धावणाऱ्या अमेरिकेतच नव्हे तर आपल्या देशातही आपल्या समक्ष काळाचा हाच दांडपट्टा सुरू आहे. डाव्या विचारसरणीचा प्रसार व्हावा म्हणून स्वकष्टार्जित अशा लाखो रुपयांचे चणेफुटाणे करून टाकलेल्या लोटवालाशेटच्या महिन्यापूर्वी, वयाच्या पंचाण्णवाव्या वर्षी झालेल्या शांत निधनानंतर वाचकांना कळलं की लोटवालाशेटजी आजवर जिवंत होते ! धान्य दळण्याच्या गिरण्या चोख चालवणे, त्यातून मिळणाऱ्या रगड नफ्यावर स्वतः लंडनच्या थंड हवेत

उपभोगात आयुष्य काढणे, उरलेला पैसा होतकरू विद्यार्थी आणि सार्वजनिक कार्यकर्ते ह्यांना गांधीतत्त्वज्ञानाचा काटा ह्या भूमीतून काढून टाकण्याची प्रेरणा देणाऱ्या डाव्या विचारसरणीचा व्यासंग करण्यासाठी मुक्तहस्ते वाटणे आणि उत्तमोत्तम ग्रंथांचा संग्रह करणे, ह्या चारच गोष्टी शेटजींनी आजन्म केल्या. गांधी आणि स्टॅलिनला विरोध करणं हे त्यांनी आपलं अवतारकृत्य मानलं. त्या निमित्ताने वृत्तपत्रं काढली. 'चित्रा' हे एक काळ गाजवलेले मराठी साप्ताहिक त्यांच्याच मालकीचे होते. एकेकाळी ह्या डाव्या, डोळस धनिकाचे नाव महाराष्ट्रात सतत गाजत होते. डॉ. ग. य. चिटणीसांना त्यांनीच हात दिला होता. त्यानंतर कृष्णा-गोदावरींना अनेकदा पूर येऊन गेले. पाणी बदललं. काळ बदलला. माणसं बदलली. मुख्य म्हणजे माणसांची मनं बदलली. लंडनमधल्या 'आर्यभवना'त बसून भारतातल्या व्यवहारावर लक्ष ठेवणाऱ्या शेटजींनी वृत्तपत्रांचे आणि छापखान्यांचे व्यवहार आवरते घेतले आणि डाव्या तत्त्वज्ञानाची पुस्तके घेऊन ते वृद्धापकाळी देवळालीला डोंगरी वाऱ्याच्या झोतात विश्रांतीसाठी गेले. त्यानंतर त्यांच्याबद्दल कुणी एक अक्षरही ऐकलं नाही, की ते का ऐकू येत नाही ह्याची कुणी साधी चौकशीही केली नाही. मग बदललेल्या माणसांनी महिन्यापूर्वी त्यांच्या देहावसनाची थंड बातमी डोकं थंड ठेवून वाचली. भारतात दिवसाकाठी सतराशे साठ शेटजी मरत असतील, त्यातलाच हा एक, असाच विचार बहुतेकांनी केला असणार; किंवा तेवढाही केला नसणार. लाखो रुपयांचा राजकीय स्वरूपाचा चॅरिटी ट्रस्ट करणारे, गांधीजींच्या कोमट विचारप्रणालीचं तण समूळ उपटून काढण्याचं स्वप्न जन्मभर पाहाणारे, रोज नेमाने दोन तास नग्नावस्थेत पडून ग्रंथवाचन करणारे, छापखान्यांचा आखाडा घालणारे आणि हे सर्व करीत असताना गिरण्यांच्या हिशोबांच्या वह्या रोजच्या रोज तपासण्यात चालढकल न करणारे लोटवालाशेटजी, आजवर जिवंत होते ह्याचा साक्षात्कार ती बातमी वाचून आम्हाला झाला!

असे अनेक दाखले देता येतील. एकेकाळी पं. जगन्नाथबुवा पंढरपूरकरांचं नाव सर्व महाराष्ट्रभर झालेलं होतं. आता ह्या नव्या जमान्यात त्यांची आठवण तरी कुणाला येते? सध्या म्हणे ते कुठेतरी भुसावळच्या फाटयात आयुष्याची संध्याकाळ काढीत आहेत? सोनुबाई मुळगावकर ह्या गोवेकर गायिकेने ऐन जवानीत जे ऐश्वर्य उपभोगलं त्याला तोड नाही! तिच्या दारात शौकिनांच्या मोटारींची रांग असायची. आकाशवाणीवर तिचे कार्यक्रम तिच्या मेहेरबानीने ज्याकाळी ठरत असत, त्याकाळी तिला आणायला नि पोहोचवायला आकाशवाणीच्या मोटारी ऑफिसरांसकट तिच्या दरवाजापर्यंत जात. आराधना करावी तेव्हा तिच्या मुलाखतीचं भाग्य लाभे. पुढे काळ बदलला. रूपाला ओहोटी लागली. तिच्या अंगावर फक्त घराणेदार अस्ताई अंतऱ्याचं महावस्त्रच तेवढं उरलं. पण अस्सल पोताचे अस्ताई-अंतरे कुणा लेकाला हवे होते? तरीही किडुकमिडूक विकून सोनुबाईने

तग धरला. पण रूबाबाचं पाणी जे पालटलं ते सदाचं ओहोटीलाच लागलं. मग सोनुबाई शांतपणे जगन्नाथाच्या मोडक्या चाळीतल्या तळमजल्यावरच्या नाममात्र भाड्याच्या काळोख्या खोलीत रहायला आली. तिथेच तिचं पिकलं पान झालं. चिटपाखरूसुद्धा तिच्या दारावरून फिरकेना! बरं, तिलाही पोट विसरता येईना. हताशपणे मग ती काळवंडलेली कृश गायिका रखडत रखडत उन्हातान्हातून आकाशवाणीवर येई. शपथा घाले. गळ घाले. निदान पंचवीस रुपयांचं तरी कंत्राट द्या म्हणे. अंमलदारांच्या मुलाबाळांचं कोटकल्याण चिंते. ही अगदी कालपरवाची गोष्ट आहे. मग तिला पेजपाण्यासाठी दरमहा निदान वीस रुपड्यांचं तरी म्हातार-दाम सरकारातून मिळावं म्हणून अर्ज, विनंत्या सुरू झाल्या. ते तिचे अर्ज आम्हीच तिच्या काळोख्या खोलीत बसून लिहिले. गिरवले. विष्णु नाईकांनी खेटे घातले. शब्द टाकले. आम्ही मोक्याच्या जागांवरल्या कारकूनांसमोर टाहो फोडला. त्यांचीही हृदयं द्रवली. त्यांनी यंत्र सुरू केली आणि सोनुबाई मुळगावकरणीच्या दारात पाटच्या पाण्यासारखे वीस-पंचवीस रुपये दरमहा येत राहिले. मुळगावकरणीची एकवेळच्या पेजेची भ्रांत संपली! नि मग त्या काळोखातच तिची असह्य, जरा-जर्जर जाविकाही अचानक संपली. वृत्तपत्रांत दोन ओळींची बातमी आली, तेव्हा एकीकडे चहाचे घुटके घेत घेत वाचक नक्कीच म्हणाले असणार 'ही कोण सोनू मुळगावकरीण?' ज्यांच्या कानावर तिचं नाव पूर्वी कधीतरी पडलेलं होतं ते आश्चर्याने उद्गारले असतील, 'ही बया अजून जीवंत होती? कम्माल आहे?'

कज्जन कलकत्तेवालीचं उदाहरणही वेगळं नाही. कज्जन म्हणजे गझल-ठुमऱ्यांची सम्राज्ञी. तिच्या गानकळेच्या आस्वादाबरोबरच नेत्रकटाक्षांनी विद्ध होण्यासाठी रसिक झुंबड गर्दी करीत. तिचा तोराही लाटसाहेबी होता. ती कार्य-क्रमाला दोन कोऱ्या करकरीत मोटारी घेऊन येई. पुढच्या मोटारीत गजरे माळून गौरीसारखी सजून ती बसे. शेटलोक तिच्या मोटारीचं दार उघडीत. मागच्या मोटारीत तिची चांदीची पिकदाणी मांडीवर घेऊन तिची नोकराणी बसलेली असे. हे वैभव तिने पुरेपूर भोगलं. नंतर संध्याकाळ झाली. अंधेरून आलं. अंधारातच ती कल-कत्त्याला गेली. वळखणीला जगावं तसं जगली. आणि नाव नाही, गाव नाही, ठाव नाही, भाव नाही, अशा उफराट्या काळात निःशब्दपणे मेली. तिच्या तर मरणाची बातमीही आली नाही, त्यामुळे ती जगत होती ह्याचाही कुणाला पत्ता नव्हता.

काळाचा तडाखा हा असा आहे! आणि ह्याचा प्रखर पुरावा अप्टन सिंक्लेअर ह्या अमेरिकेच्या ध्येयवादी लेखनयोध्याच्या मरणाने पुन्हा एकदा जगाला जाणवून दिला. अप्टन सिंक्लेअर हा अमेरिकन साहित्यसृष्टीतला त्याच्या परीने भीम-पराक्रमी लेखक. आपल्या वीर सावरकरांप्रमाणे त्यानेही लेखणी शस्त्र म्हणून जन्मभर वापरली. वयाच्या सोळाव्या वर्षी त्याने आपल्या हेतुपुरःस्सर लेखनाचा टसठशीत श्रीकार टाकला. त्याच मुहूर्ताच्या वेळी, माझी लेखणी मी समाजात

सामाजिक न्यायाची प्रतिष्ठापना व्हावी म्हणूनच वापरेन अशी खूणगाठ मारली. झुंज देण्याच्या व्रतापासून तो कधीही ढळला नाही. खरे. म्हणजे सिंक्लेअर हा लेखक झालाच नसता. दर्यासारंगाच्या लढाऊ कुळांत त्याचा नव्वद वर्षापूर्वी जन्म झाला होता तोही आरमारांत अंमलदार झाला असता. पण लढायांमध्ये स्वतःच्या संपत्तीची राख करून घेतलेला त्याचा बाप पट्टीचा मद्यपी बनला आणि ते असह्य झाल्यामुळे सिंक्लेअरने घरून पळ काढला. न्यूयॉर्कमध्ये त्याने कॉलेजात नाव घातले आणि चरितार्थासाठी वृत्तपत्रव्यवसायात पाऊल टाकले. लेखणीच्या संभाव्य शक्तिचा साक्षात्कार त्याला प्रथम वृत्तपत्रात काम करताना झाला. १९०३ साली 'Springtime and Harvest' ही कादंबरी लिहून आणि स्वतःच प्रसिद्ध करून तो ललित साहित्याच्या आखाड्यात उतरला. ती माती त्याला मानवली आणि तेव्हापासून अखंड अेसष्ट वर्षे लेखणीचे हत्यार बनवून त्याने सामाजिक न्यायाच्या प्रतिष्ठापनेचे शेकडो प्रश्न हाताळले.

लेखणीच्या शक्तिवर त्याची इतकी निस्सीम श्रद्धा होती की लिहायला सुरुवात केल्यापासून अवघ्या एका वर्षातच त्याने 'Confessions of a Young Author' ही पुस्तिका लिहून आपल्या वैचारीक बैठकीची जाहीर मांडणी केली. तावडतोब त्याने 'My cause' ही पुरवणी पुस्तिकाही प्रसिद्ध केली. मात्र उमेदवारीच्या काळात त्याला ना मान्यता मिळाली की ना मिळाला प्रकाशक. म्हणून स्वतःचे साहित्य स्वखर्चाने, स्वतःच प्रसिद्ध करून ते नाक्यानाक्यावर उभे राहून, ओरडून विकण्याचा त्याने उद्योग आरंभिला. विद्यार्थ्यांच्या नव्या पिढीवर त्याची भिस्त होती. कॅलिफोर्नीया विद्यापीठाच्या आवारात एका खोक्यावर उभे राहून तो स्वतःची पुस्तके विकत असताना त्याच्याकडून 'The Jungle' ची प्रत घेतल्याचा अनुभव, अमेरिकन कादंबरीकार आयर्व्हींग स्टोन ह्याने कौतुकाने नमूद करून ठेवला आहे. शिकागो शहरातील मांसविक्री व्यवसायातली कृष्णकारस्थानं त्याने १९०६ साली Jungle मध्ये कादंबरीच्या रूपाने चव्हाट्यावर मांडली. ती विलक्षण गाजली; इतकी की १९३८ साली पेंग्विनने तिची अडुसष्टावी जागतिक आवृत्ती प्रसिद्ध केली ! ती वाचून अमेरिकेच्या अध्यक्षांनी मांसविक्रीतील भ्रष्टाचाराच्या विरुद्ध कायदे मंजूर करून घेतले. १९१४ साली त्या कादंबरीवर एक मूक चित्रपटही काढण्यात आला होता.

सिंक्लेअर हा मुख्यत्वे कादंबरीकारच राहिला. अमेरिकन वृत्तपत्रव्यवसायाचे वाभाडे काढण्यासाठी त्याने 'Brass Check' लिहिली. तिची पहिली आवृत्ती दीड लक्ष प्रतींची होती ! 'Cup of Fury' ही त्याची कादंबरी मद्यपानविरोधी आहे. स्वतः सिंक्लेअर फार सोवळा होता. मदिरा, मदिराक्षी आणि मांसभक्षण ह्यांच्या वाटेला तो जन्मात कधीही गेला नाही. निरनिराळे सामाजिक विषय घेऊन ते धसाला लावायचे हाच त्याने हयातभर ध्यास केला. शिक्षण विषयक बजबजपुरी

शाखविन्यासाठी 'Goose Step' आणि 'Goslings', स्पेनमधल्या फ्रँकोच्या जुलमाचा धिक्कार करण्यासाठी 'No Pasaran', लैंगिक रोगाची भीषणता पटविण्यासाठी 'Damaged Goods', भांडवलशाहीची काळी बाजू उजेडात आणण्यासाठी 'Oil' आणि जगभरचे रक्तपिपासू राजकारण समजून सांगण्यासाठी 'World's End', 'Between Two Worlds', 'Wide is the Gate', आणि 'Presidential Agent' ही कादंबरीमाला लिहून काढली. 'Dragon's Teeth' ह्या कादंबरीला १९४२ साली त्याला अमेरिकेतले पुलित्झर पारितोषिक मिळाले. त्याला नोबेल पारितोषिक मिळावे म्हणून युरोपात बरीच खटपट झाली होती. पण अखेरपर्यंत या सर्वोच्च मानापासून त्याला वंचित रहावे लागले.

कादंबरीप्रमाणेच त्याने नाटकेही लिहिली. १९११ साली त्याने 'Plays of Protest' ह्या मथळ्याखाली चार नाटिका लिहिल्या. तेवीस साली 'Hell' नावाचे एक नाटक मुक्तछदात लिहिले. त्याच्या पुढच्याच वर्षी त्याने 'Singing Jailbirds' आणि 'Pot-Boiler' ही दोन नाटके लिहिली. मात्र नाटयलेखन त्याला लाभले नाही. हॉलिवुडच्या परिसरात वास्तव्य केल्यामुळे चित्रपट जगताशी त्याचा संबंध आला. बत्तीस साली मेट्रोतर्फे 'Wet Parade' हा त्याचा चित्रपट प्रकाशीत झाला. पण चित्रपट निर्मात्यांचे त्याला कडू अनुभव आले. त्याच्या कथाकादंबऱ्या चित्रपटाच्या सोईसाठी इतक्या दुरुस्त होऊ लागल्या की अखेर त्या आपल्याच आहेत हे त्याला ओळखताही येईना! तेव्हा त्याने चित्रपटांचा नाद सोडला. मात्र एकदा उत्स्फूर्त यऊन त्याने मेक्सिकोच्या क्रांतीवर स्वतःच एक चित्रपट निर्माण केला होता.

आरोग्य कसे राखावे, कुठचे अन्न कसे खावे, उपोषणाचे सुपरिणाम काय होतात, आर्थिक स्थिती कशी सुधारावी, समाजवादानेच तरणोपाय का आहे, खरा ख्रिश्चन कोण, कम्युनिझममधले दोष कोणते आहेत, विद्यार्थ्यांनी काय शिकावे, स्पेनमधले राजकारण काय म्हणते, अशा यच्चयावत सर्व बाबींवर त्याने पुस्तिका लिहिल्या. अमेरिकन सिनेटच्या आणि कॅलिफोर्नियाच्या गव्हर्नरपदाच्या निवडणुका चोवीस वर्षे परत परत लढवून तो पडला. मग पुन्हा त्या अनुभवावर त्याने पुस्तिका लिहिल्या. अमेरिकन राजकारणात भाग घेतल्यामुळे त्याला आतल्या गोटातल्या गुप्त बातम्या कळत, त्यांचा उपयोग करून त्याने कादबऱ्या लिहिल्या. जागतिक राजकारणाचा त्याचा व्यासंग सूक्ष्म होता. अमेरिकेत बसून केवळ पुस्तके वाचून आणि नकाशे पाहून त्याने स्पेनच्या यादवीवरली 'No Pasaran' ही कादंबरी लिहिली. भारतीय लेखक के. अहमद अब्बास, सिंक्लेअरला अडतीस साली अमेरिकेत भेटले तेव्हा सिंक्लेअरने भारतीय कांग्रेस आणि तिच्यातल्या उजव्या-डाव्या गटांबद्दलही माहिती विचारली, इतके त्यांचे लक्ष बारीकसारीक गोष्टींकडे होते. सिंक्लेअरच्या कलाकृतींचे मराठी, बंगाली, गुजराती, तामिळ वगैरे भाषांत झालेल्या भाषांतरीत पुस्तकांच्या प्रती अब्बासना सिंक्लेअरच्या घरात पाहायला मिळाल्या. जगातल्या




शाखा : सावदी रोड अहमदनगर

डेपो : मेसर्स खरे अॅन्ड सन्स, पुणे २

प्रमुख अशा पन्नास भाषांमध्ये सिंक्लेअरच्या पुस्तकांची भाषांतरे झालेली आहेत सिंक्लेअरचे वाङ्मय म्हणजे आधुनिक काळाचा इतिहासच आहे असे शॉचे मित्रांना सांगणे असे. 'नो पासारान' ही प्रा. ना. सी. फडके ह्यांनी अनुवादलेली कादंबरी मराठीत उपलब्ध आहे.

सिंक्लेअरने म्हटले आहे, 'निरनिराळ्या भाषांमधून प्रसिद्ध झालेल्या माझ्या पुस्तकांची संख्या आठशे भरते. माझी पुस्तके कोटी-कोटींनी खपली. सर्व जागतिक उच्चांक निदान ग्रंथांच्या दुनियेत तरी मी मोडले आहेत. गाढ श्रद्धा ही माझ्या वाङ्मयाची गंगोत्री आहे. माझ्या वाङ्मयात संदेश आहे आणि सामान्य वाचकाला कळेल, पटेल, अशा खुबीने मी तो मांडला आहे. मी हाडाचाच स्वतंत्र माणूस आहे. लोकशाही समाजवाद हाच माझा वेद. जे स्वातंत्र्य मी उपभोगलं ते इतर सर्वांना मनसोक्तपणे उपभोगायला मिळाले पाहिजे. राजकीय स्वातंत्र्य आणि आर्थिक न्याय ह्यांच्या जोरावर दारिद्र्य आणि युद्ध ह्यांचा निःपात करता येईल. आपल्यापाशी हत्यारे आहेत. ती वापरायची कशी हे कळेल तो सुदीन!'

असा हा बलाढ्य असूनही पराई पिडेची जाण आणि चाड असलेला हत्यारी लेखक अप्टन सिंक्लेअर! भारतीय स्वातंत्र्याच्या प्रश्नाची तड लावण्यासाठीही त्याने अमेरिकेत उद्योग केलाच होता. जगभरच्या लेखकांना शांतपणे लिहा-वाचावयाला मिळावं म्हणून त्याने अमेरिकेत एक माळरान खरेदी करून त्यावर साहित्यिकांसाठी सर्व सोयींनी युक्त असं मोफत विश्रांतीधाम बांधले. पुढे ते आगीत भस्मसात झालं. तरीही तो खचला नाही. डिकन्सप्रमाणेच सर्वांची सोय त्याने अगत्याने पाहिली. कोट्यवधी डॉलर्स केवळ कसबी लेखणीवर त्याने जमा केले. जिथे उभ्या हयातीत आठ ग्रंथ तयार होणं हेच मुळी दिव्य असतं तिथे त्याच्या लेखनाची आठशे भाषांतरीत पुस्तकं झाली ह्याचा अर्थ काय होतो? एखाद्या यंत्रासारखा तो लिहीत गेला. उदंड यश, प्रसिद्धी, मान्यता आणि पैसा त्याच्या पायापाशी आले.

पण एवढं कौतुक असूनही कुठतरी पाल चुकचुकलीच! बर्नार्ड शॉ, सॉमरसेट, मॉम, ई. एम. फॉर्स्टर, चर्चिल वगैरे खंद्या लेखनवीरांप्रमाणे सिंक्लेअरलाही दीर्घ आयुष्य लाभलं, पण ते चौघे मरेपर्यंत गाजत होते. आणि सिंक्लेअर? पुस्तकांच्या दुनियेतले खपांचे, भाषांतरांचे, गतींचे, विषयवैविध्याचे, दानतीचे, वगैरे सर्व जागतिक उच्चांक मोडणाऱ्या ह्या लेखणीबहाद्दर योद्ध्याचं नाव एकदम एकाएकी ऐकू यायचंच बंद झालं! त्याचं खातंच जणू समाप्त झालं. त्याचं लेखन थांबलं आणि त्याच्या कीर्तीला जणू टाळंच लागलं. वृद्धापकाळामुळे झालेल्या त्याच्या शांत निधनाची छोटेखानी वार्ता येईपर्यंत तो जीवंत होता हेही फारसं कुणाला माहीत नव्हतं. आता मृत्यूनंतरही त्याचं नाव कुणी अगत्यपूर्वक घेतलं आहे असं दिसत नाही!

पहा, काळ कसा एकेकाचा कबजा घेतो आहे! ◻ ◻ ◻

२२ मे १९७१

# एपार बांगला
# ओपार बांगला
# जय बांगला
# जय बांगला

अनिल बर्वे

लेखांक पाचवा

हेलिकॉप्टरच्या घरघराटीने जागा झालो!

एक लष्करी हेलिकॉप्टर सकाळपासून आगरताळ्यावर घिरट्या मारीत होते. आजपासून 'सायरन' सुरू होणार होता. सकाळपासून लष्करी गाड्या इकडून तिकडे हिंडत होत्या. पाक सैन्याच्या मॉर्टर्सचा मारा भारतीय हद्दीला भिडू लागला होता. इंदिरा गांधींनी त्याबद्दल पाकिस्तानला इशारा दिल्याने गावात अफवांचे पीक उठले होते. त्यात दोन पाक हेरांना बी. एस. एफ. ने पकडल्याने त्या 'माताहारी पुत्रांना' पहायला पोलीस स्टेशनसमोर ही हुल्लड जमावाने चालवली होती. एकंदरीत गावात युद्धजन्य वातावरण पसरले होते.

ब्रेकफास्ट घेत होतो तेवढ्यात 'गौतमदास' धावत धावत आला. गौतमदास हा येथल्या स्टूडंट्स फेडरेशनचा कार्यकर्ता. कर्नल चौमनी येथे शेख मुजिब अल् रेहमान यांचे प्रेस सेक्रेटरी 'बादशा' आले असल्याची वार्ता त्याने आणली होती. बादशांना भेटायला तीन-चार दिवस चकरा मारत होतो पण ते कलकत्त्याहून परतले नव्हते.

कर्नल चौमनीला जायला रिक्षा गाठली. रिक्षा कसली युधिष्ठिराचा रथच तो! गावातल्या भिंतीवर नव्या घोषणा चितारलेल्या दिसत होत्या. काल परवापर्यंत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या निवडणूक घोषणा आणि माओ वचनेच दिसत होती. आता मात्र बंगाल्यांचे बंगाली प्रेम जागृत झाले होते.

दुई बंगाल दिच्छे डाक, याह्या निःपात याक – दोन्ही बंगालचा एकच आवाज याह्याखान मुर्दाबाद – उडीये दाओ दुई बांगलार चेक पोस्ट – दोन्ही बंगालमधील चेकपोस्ट उडवून टाका – एपार बांगला, ओपार बांगला, जय बांगला, जय बांगला – हिंदू मुसलमान मानी ना, बांगला छाडा किछु जानी ना – बाकी घोषणा लिहिण्यात साती खंडात भारतीय उपखंडातील लोकच तरबेज हेच खरे!

चौकामध्ये डाव्या कम्युनिस्टांनी बांगला देशच्या स्वातंत्र्यसंग्रामावर याह्याखानाची टर उडविणाऱ्या व्यंगचित्रांचे प्रदर्शनच भरवले होते. निर्वासितांना मदत करण्यासाठी फंड जमविण्याचे कामही जोरात चालले होते. अखेर बंगाली हा

# पुरी ते डाक्का



बंगालीच. प्रथम तो बंगाली असतो मग हिंदू किंवा मुसलमान असतो. प्रथम तो बंगाली असतो मग तो भारतीय वा पाकिस्तानी असतो. बंगाल्यांचे भाषेचे 'स्पिरीट' इतरत्र कोठे सापडावयाचे नाही. काही झाले तरी जगातल्या पाचव्या क्रमांकाची भाषा म्हणून बंगालीला स्थान आहे. कलकत्त्यापासून त्रिपुरापर्यंत जो जो म्हणून बगाली मला दिसला तो जय बांगलाचा घोष करतानाच दिसला. शेख मुजिब अल् रेहमानचे फोटो घराघरातून झळकताना पाहिले आणि इथेच थोडी अनामिक भिती वाटली.

बांगला देशच्या नावाने उभा राहिलेला हा Provincial Sectarianim प्रादेशिक

प्रांतिकवाद भारताचे दुखणे तर ठरावयाचा नाही ना ! भारतातल्या कोणत्या एका प्रांताची भाषा-संस्कृती दुसऱ्या प्रांताशी मिळतीजुळती आहे ? जर प्रत्येक प्रांतात हा 'जय बांगला'चा प्रतिध्वनी उमटला तर ? पूर्व बंगालचे पश्चिम पाकिस्तानने आर्थीक शोषण केल्याची ओरड आहे – ती खरीही आहे पण आपण जरा अंतर्मुख झालो तर आपणास दिसेल, आपल्याकडील विकसीत भाग इतर विभागांचे शोषणच करीत आहेत. केवळ मुंबई किती विभागाचे शोषण करते याचे कोणी गणित मांडले आहे काय ? आसाममधून केंद्रसरकार साडेचारशे कोटी रुपयांची मिळकत करते परंतु आसामवर खर्च मात्र केवळ दीडशे कोटी रुपये होतो. तेल आसाममध्ये निघते पण त्यांचे कर व फायदे मात्र बिहारला मिळतात – हे आसामचे शोषणच नव्हे काय ? स्वैर–

एका मर्यादीत अर्थाने आज तरी 'बांगला देश' चळवळ पुरोगामी आहे. धर्माधिष्ठित राष्ट्रवादाचा फोलपणा तिने स्पष्ट केला आहे. द्विराष्ट्रवादाच्या सिद्धांताविषयी बोलताना महात्मा गांधी म्हणाले होते की– 'केवळ द्वेषावर कोणतेही राष्ट्र जगू शकत नाही.' त्यांच्या बोलण्यातले सत्य तेवीस वर्षांनंतर आज उफाळून वर आले आहे.

१९०५ मध्ये लॉर्ड कर्झनने बंगालची फाळणी केली तेव्हा गुरुदेव टागोरांनी लिहिले होते–'बांगलार माटी बांगलार जल, बांगलार वायु बांगलार फळ. ऐक होक ऐक होक, हे भगवान.' कर्झनच्या फाळणीविरुद्ध झालेल्या जोरदार आंदोलनाने इंग्रजांनी जी फाळणी रद्द केली तीच बंगाल्यांनी धर्माच्या नावावर एकमेकांचे गळे कापत ४७ साली पुन्हा घडवली. धर्म ही अफूची गोळी आहे हे सत्य तर नव्हे ?

फाळणी झाली खरी परंतु लवकरच बंगाली माणसाच्या ध्यानात आले की ही फाळणी खोटी आहे – कृत्रिम आहे. धामिक जुलूमशाही कोणत्याही संस्कृतीला मारू शकत नाही. दरम्यान वाढत असलेल्या नव्या पिढीने या कृत्रिम फाळणीविरुद्ध आवाज उठवला. फाळणीने बंगाली भाषा दडपली जाऊन उर्दूचे वर्चस्व लादले जात होते. यातूनच २१ फेब्रुवारी ५२ ला पूर्व बंगालमध्ये भाषा आंदोलनाला सुरुवात झाली. अब्दुल जब्बार, रफीकुद्दीन, अब्दुल बरकत, उफीउर रहमान, अब्दसलाम आदींनी हौतात्म्य पत्करले. भाषेने धर्मावर मात केली. पाकिस्तान सरकारच्या विरोधास न जुमानता बंगाली मुसलमानांनी मोठ्या उत्साहाने रवींद्रनाथ टागोरांची जन्मशताब्दी साजरी केली. प्रगतीशील मुस्लीम लेखकांच्या लिखाणातून जातीयवादी लिखाणाचे पूर्ण उच्चाटन झाले. आणि बंगाली राष्ट्रवाद आकार घेऊ लागला.

अगदी अलीकडे वर्षापूर्वी पूर्व बंगालमधील प्रसिद्ध साहित्यिक शंकर यांनी – ज्यांच्या 'चौरंगी' या कादंबरीने दहा वर्षाचा विक्रीचा उच्चांक मोडला आहे

त्यांनी 'एपार बांगला–ओपार बांगला' नावाचे यात्रा वर्णन लिहिले. त्यांच्या दोन्ही बंगालच्या सांस्कृतिक ऐक्याचे दर्शन देणाऱ्या त्या यात्रा वर्णनाच्या केवळ वर्षात नऊ आवृत्या काढाव्या लागल्या. 'एपार बांगला–ओपार बांगलाने' बांगला देशच्या चळवळीत वंदेमातरमचे स्थान पटकावले आहे. शंकर यांना बंगाल स्वाधीनतेच्या चळवळीतले बंकीमचंद्र म्हणून स्थान प्राप्त झाले आहे. 'एपार बांगला–ओपार बांगला' हा स्वातंत्र्य योद्धयांचा परवलीचा शब्द होऊन बसला आहे.

स्वाधीन बांगला चळवळीत शंकर यांच्या एपार बांगलाला आणि शेख मुजिब अल् रेहमान यांच्या १९६६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'आमादेर बांचबार दाबो' या पुस्तकाला धर्मग्रंथाचे महत्त्व प्राप्त झाले आहे. आमादेर बांचबार दाबी म्हणजे 'आमचा जगण्याचा अधिकार' हेच पुस्तक सहा कलमी कार्यक्रम म्हणूनही प्रसिद्ध आहे. वंगबंधू शेख मुजिब अल् रेहमान !

१९६८ मध्ये आयुबखानांनी शेख मुजिब अल् रेहमान यांना त्यांच्या काही सहकाऱ्यांसह आणि सैनिकी अधिकाऱ्यांसह तुरुंगात टाकून त्यांच्यावर 'ढाक्का षडयंत्र केस' सुरू केली तेव्हाच सर्वसामान्य भारतीयांना मुजिब अल् रेहमान हे नाव परिचित झाले. भारत सरकारच्या मदतीने पाकिस्तान सरकार उलथून टाकण्याचा कट केल्याबद्दल तो खटला दाखल करण्यात आला होता. 'ढाक्का षडयत्र केस' 'आगरताळा षडयत्र केस' म्हणूनही प्रसिद्ध आहे. हा खटला पुढे लोकमताच्या दडपणाने आयुबखानांनी मागे घेतला

एक्कावन्न वर्षाच्या मृदुभाषी परंतु स्पष्टवक्ता असलेल्या शेख साहेबांचा जन्म फरीदपूर जिल्ह्यात तुंगीपाडा गावामध्ये १९२१ साली झाला. १९४७ मध्ये इस्लामिया कॉलेज कलकत्ता येथून त्यांनी ग्रॅज्युएट पदवी घेतली. परंतु त्या आधीच म्हणजे १९४० सालापासूनच त्यांच्या राजकीय जीवनास प्रारभ झाला होता. सुरुवातीस ते मुस्लीमलीगचे सदस्य आणि अखिल भारतीय मुस्लीम छात्र लीगचे अध्यक्ष होते. परंतु फाळणी नंतरच्या काळात त्यांचे मुस्लीम लीगशी मतभेद वाढत जाऊन त्यांनी मुस्लीम लीगचा राजीनामा दिला आणि डमोक्रॅटीक युथ लीगची स्थापना केली. येथूनच त्यांच्या निधर्मी राजकीय धोरणास प्रारंभ झाला ––

तरुणवयात शेख रेहमान यांचा मुस्लीम लीगशी असलेला संबध पाहून आमच्याकडील काही विचारवंत शेखसाहेबांच्या सेक्युलर धोरणास एक राजकीय चाल समजतात. परंतु ढाक्याचे तरुण बॅरिस्टर ए. सी. दत्त मला म्हणाले की पूर्व पाकिस्तानात १९६४ च्या नतर एकही जातीय दंगल झाली नाही वा हिंदूंचा छळ झाला नाही याचे एकमेव कारण शेख रेहमान यांचे नेतृत्व होय.

...अखेर कर्नल चौमनी बांगला देश सरकारच्या अनधिकृत कचेरीपर्यंत पोचलो. कर्नल चौमनी येथील एक बंगला फोन गाडी आदी सर्व सुखसोयींनीशी बांगला देश सरकारला देण्यात आलेला आहे. डावा हात प्लॅस्टरमध्ये असलेल्या एका तिशीच्या

तरुणाने – बादशाने – अत्यंत थंड स्वागत केले. याच माणसाने तीन-चार दिवस, बादशा गावाला गेले आहेत अशा थापा मारून फेऱ्या मारायला लावल्या होत्या. माझ्या चिकाटीने त्याचा नाइलाज होऊन पंधरा वीस मिनिटात त्याने अत्यंत रुक्षपणे 'शेख मुजिब अल् रेहमान जीवन आणि चरित्र' तारीखवार सनावळीसह सांगितले.

शेख मुजिब अल् रेहमान यांच्या राजकीय व्यक्तिमत्वाचा इतिहास म्हणजे बंगालच्या राजकारणातील अंतर्विरोधाचाच इतिहास असे म्हटले पाहिजे. लीगमध्ये असल्यापासूनच रेहमान हे पै. सुऱ्हावर्दींचे अनुयायी होते. सुऱ्हावर्दी हे ४६–४७ साली बंगालच्या मुस्लीम लीगच्या मंत्रीमंडळाचे मुख्यमंत्री होते. सुऱ्हावर्दींच्या जेव्हा लक्षात आले की कॉंग्रेस नेते फाळणीला मान्यता देणार आहेत, तेव्हाच बंगालच्या विभाजनापेक्षा 'स्वतत्र बंगाल'ची कल्पना त्यानी गांधींपुढे मांडली होती आणि गांधींनीसुद्धा या कल्पनेला पाठिंबा दिला होता. परंतु स्वतंत्र बगालची योजना पुढ मांडण्यास सुऱ्हावर्दी धजावले नाहीत.

फाळणीनंतरच्या काळात सुऱ्हावर्दी व लीग यांच्यातील अंतर वाढतच गेले. प. पाकिस्तानतर्फे पूर्व पाकिस्तानवर होत असलेला अन्याय सुऱ्हावर्दींच्या लक्षात आला होता आणि म्हणूनच एका खाजगी बैठकीत बोलताना सुऱ्हावर्दी म्हणाले होते –'अमेरिकेकडून मिळत असलेल्या शस्त्रांचा पंजाबी नेते बंगाली जनतेवरसुद्धा उपयोग करतील.' सुऱ्हावर्दींचे हे उद्‌गार ते स्वतः पाकिस्तानचे पंतप्रधान असताना काढलेले आहेत हे लक्षात घेण्याजोगे आहे.

१९४९ मध्ये जेव्हा मौलाना भाषाणींनी अवामी लीगची स्थापना केली तेव्हा सुऱ्हावर्दीसह शेख मुजिब अल् रेहमान यांनी अवामी लीगमध्ये प्रवेश केला. त्यानंतरच्या काळात बंगाली भाषा आंदोलन – स्वायत्तता आंदोलन इत्यादी अनेक आंदोलनात वारंवार कारावास शेखसाहेबांनी भोगला. आजवर शंभराच्यावर राजकीय खटल्यांना त्यांना तोंड द्यावे लागले आहे.

१९५४ मध्ये मुस्लीम लीगविरुद्ध सुऱ्हावर्दींच्या अवामी लीगने फजलहक यांच्या कृषक श्रमिक पक्षाबरोबर आणि इतर पक्षांबरोबर संयुक्त आघाडी करून निवडणूक लढवली – ज्या मुस्लीम लीगने केवळ सात आठ वर्षांपूर्वी डायरेक्ट ॲक्शनची घोषणा करून हसत हसत पाकिस्तान मिळवले तिला या निवडणुकीत नामशेष व्हावे लागले.

निदान् मुस्लीम लीगच्या दारूण पराभवानंतर तरी पंजाबी नेत्यांनी जागृत व्हावयास पाहिजे होते. भाषावार प्रांतरचना आणि लोकशाही विकेंद्रीकरणाचा भारतीय मार्ग चोखाळून देशात लोकशाहीवादी आणि सांस्कृतिक अभिमान न दुखावणारी सत्ता निर्माण करावयास पाहिजे होती – परंतु मुस्लीम लीगच्या जुनाट विचारांच्या सरंजामदारी नेत्यांना हे सत्य कधी उमगले नाही. या नेत्यांनंतर आले

, लष्करशहा.' पूर्वीचे सुलतान आणि हे लष्करशहा यांच्यात अंतर शोधून सापडत नव्हते पूर्व बंगालचे शोषण–जुलूम–वशिलेबाजी–भ्रष्टाचार–बेदिली यांचे नवनवे उच्चांक लष्करशहांनी निर्माण केले. भारतात 'काही वर्षे' तरी लष्करी सत्ता हवी म्हणणाऱ्यांनी पाकिस्तानचे उदाहरण तपासण्याजोगे आहे.

निवडणुकी संपल्या आणि स्वतंत्र पूर्व पाकिस्तान मागणाऱ्या 'अतिरेकी' भाषाणींशी सुऱ्हावर्दी–रेहमान जोडीचे पटेनासे झाले. लवकरच ही द्वयी अवामी लीग मधून बाहेर पडली. ज्या स्वातंत्र्याच्या 'अतिरेकी' धोरणामुळे शेखसाहेब भाषाणींपासून वेगळे झाले त्या स्वातंत्र्याची घोषणाही त्यांनाच करावी लागली. हा दैवदुर्विलास की काळाचा महिमा? हा संघर्ष पूर्व बंगालात चालू असतानाच अठ्ठावनमध्ये लष्कराने सत्ता आपल्या ताब्यात घतली. मुजिब अल् रेहमान यांना अटक झाली. या लष्करी राजवटीत विद्यार्थी चळवळींना ऊत आला. बांगला देशच्या पार्श्वभूमीसाठी या विद्यार्थी चळवळीच फार मोठ्या प्रमाणावर कारणीभूत झाल्या. सुमारे अर्धा डझन खटल्यातून बाइज्जतरीहा होऊन शेखसाहेब बाहेर पडले. बाहेर येऊन त्यांनी जनसंघटनेचे काम हाती घेतले न घेतले तोच ६२ मध्ये सुऱ्हावर्दीसह पुन्हा शेखसाहेबांना बंदीयात्रा घडली. पुढे आयुब शासनाने राजकीय पक्षांवर लादलेली बदी उठविण्यात आली आणि अवामी लीगच्या पुर्नसंघटनेस सुरुवात झाली. या आधीच सुऱ्हावर्दीचे निधन झालेले होते आणि अवामी लीगचे नेतृत्व निर्विवादपणे शेख मुजिब अल् रेहमान यांचेकडे आले.

पुढचा इतिहास मला माहितच होता–म्हणूनच त्या 'बखरकाराला' थांबवत मीं विचारले–सहा कलमी कार्यक्रम आहे?–अवामी लीगचा निवडणूक जाहीरनामा आहे? पक्षाचा कार्यक्रम व घटना आहे?–माझ्या प्रत्येक प्रश्नाला वेगवेगळ्या शब्दरचनेत त्याने नकाराचेच उत्तर दिले. प्रेस सेक्रेटरी आणि त्याच्याकडे कोणताही मजकूर पत्रकारांना देण्यासाठी नसणे हा मोठा विनोदच होता–एकंदरीत तो बंगला म्हणजेच मोठा विनोद होता–

माझी कल्पना होती की–भूमिगत आणि वनवासी सरकारचे कार्यालय म्हणजे कोणत्या तरी 'विरान खंडरमे खुफीया महल' असेल. पण हा बंगला तर अगदी उन्हाळ्यासाठी कोणा मारवाडी कुटुंबाने सुट्टी मजेत घालवण्यासाठी घेतलेला दिसत होता. मी जेव्हा जेव्हा गेलो तेव्हा लाकडी खाटांवर मच्छरदाणी लावलेल्या बिछान्यात लोक झोपलेले असत. आतल्या डायनिंग हॉलमध्ये जेवणावळी चाललेल्या असत. एकंदर वातावरणात हे युद्धकालीन बांगला सरकारचे कार्यालय आहे याची पुसटशी सुद्धा कल्पना येत नव्हती.

थोडीशी गडबड ऐकली म्हणून खिडकीतून बाहेर डोकावलो–बाहेर मुक्तीफौजेच्या तरुण पोरांना 'शांतपणे' काडतुसे वाटण्याचे काम चालले होते. सर्व थ्रीनॉटथ्रीच्या बुलेटस दिसत होत्या. त्या तिथे रांगेत उभे राहून कोणालाही ती शस्त्रसामुग्री

जमा करणे शक्य होते. आपला गावठी शिकारी घेईल तेवढी सुद्धा ते 'स्वातंत्र्ययोद्ध' आपल्या शस्त्रांस्त्राची काळजी घेत नव्हते–कोणीही यावे नी पाहून जावे इतका खुला व्यवहार. यांचेपेक्षा पेंढारी बरे होते !

'माणस'चे वाचकांसाठी काही जिवंत मजकूर देण्याची इच्छा श्री. बादशा–'पर्सनल प्रेस सेक्रेटरी' याने फोल केली त्याला मी शेख मुजिब अल् रेहमानविषयी विचारले तेव्हा ते अटकेत नसल्याचे त्याने ठासून टासून सांगितले पण २९ मार्च नतर शेख साहेबांना भेटलेला एकही इसम मला भेटला नव्हता. 'इफ्तीकार अहमदने' मात्र शेखसाहेबांना अटक झाल्याचे शपथ घेऊन सांगितले. नंतर नतर तर शेख मुजिब अल् रेहमान हे अटकेत असल्याची माझी निश्चित खात्री होऊन बसली.

या प्रेस सेक्रटरीने प्रेस सेक्रेटरी म्हणून काही काम केल्याचे माझ्या पाहण्यात आले नाही. त्रिपुराचे चीफ सेक्रेटरी जवळजवळ रोज दुपारी तीन वाजता अन-ऑफिशियल प्रेसमीटिंग बालावून आलेल्या पत्रकारांना कॉफी आणि खुसखुशीत खाऱ्या बिस्किटांबरोबर रुचकर 'सरकारी बातम्याही' देत. या बातम्यांत सत्य शोधून सापडत नसे. मी पंधराला आखवऱ्याला असतानाच पाक सैन्य आखवऱ्यामध्ये घुसत होते. माझ्या माहितीप्रमाणे सोळाला आखवराचा संपूर्ण ताबा पंजाबी सैन्याने घेतला होता आणि इकडे अठरा तारखेलाही चीफ सेक्रेटरी मुक्ती-फौज लढत असल्याबद्दलची सरकारी बातमी पत्रकारांना सांगत होता त्रिपुराच पब्लिक रिलेशन्स ऑफिसर भौमिक हेही 'बांगला देश'ची माहिती पत्रकारांना मिळावी म्हणून सरकारी तैनातीत जीपगाड्यांसह पाक हद्दीत सहल करवून आणत. फिल्म डिव्हीजनचे प्रेम वैद्य आपल्या सहकाऱ्यांसह आले असताना–पाक सरकारने चालवलेले अत्याचार या सरकारी अधिकाऱ्यांनी आत नेऊन त्यांना चित्रीत करण्यास मदत केली होती. थोडक्यात बांगला देशच्या अधिकृत प्रवक्त्याची भूमिका भारत सरकारच बजावीत होते–अवामी लीगचे नेते झोपा काढीत होते.

अवामी लीगच्या बेजबाबदार आणि बेफिकीर नेत्यांनी–नेते कसले मोठेपणासाठी हपापलेले पुढारीच ते. या पुढाऱ्यांनी आपल्याच रक्तामांसाच्या निर्वासितांचीही कधी चौकशी केली नाही. मी अनेक निर्वासितांच्या कॅंपला भेटी दिल्या. त्या निर्वासितांची चौकशी भारतीय अधिकारी करीत होते. त्यांची सोय भारतीय अधिकारी करीत होते. अधिकारी कमी आणि निर्वासित जास्त. यामुळे निर्वासितांची फार आबाळ व्हायची–अर्थात त्या करता अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात अर्थ नाही. त्या निर्वासितांच्या मतावर निवडून आलेल्या पुढाऱ्यांनी मात्र निर्वासितांना मार्गदर्शन करू नये–त्यांना सरकारी सोयी सवलतींचा फायदा मिळवून देऊ नये हे नवलच नव्हे काय ? नवल तरी कसे म्हणावे–'सनदशीर मार्गाने संसदेत निवडून गेलेले नेते ते–त्यांचा आणि जनतेचा तसा फारसा जवळचा संबंध कसा असणार ?

अवामी लीगच्या या 'जनता निरपेक्ष' स्वातंत्र्य चळवळीकरता श्री बादशाला

चांगलेच बोललो. तोही निरुत्तर झाला. मान खाली घालून पाऊण तास त्याने माझी टीका ऐकली आणि म्हणाला-" प्रथम आमच्या चळवळीतच थोडेसे अडथळे निर्माण झाले. आता आमचे सरकार स्थापन झाले आहे-चळवळीतील उणीवा आणि दोष शोधून दुरुस्त करू "

आमचे बोलणे चालू होते तोच चार पाच सरकारी कर्मचारी फॅनस् घेऊन आले. स्वातंत्र्ययोद्धयांना उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून भारत सरकार किती काळजी घेत होते त्याचाच जागता पुरावा होता. त्या गडबडीत माझी 'अडचण' नको म्हणून निघालो. तेवढ्यात समोरच्या कॉटवर 'पहुडलेला' एक 'नेता' मला म्हणाला-" बर्वेस ब, हम भी आपके साथ कुछ बातचीत करना चाहते आहे "

आपण ? मी अत्यंत निर्विकार प्रश्न केला.

" मी मीर हुसेन चौधरी. प्रॉव्हिन्शियल असेंब्लीचा मेंबर आहे. कोमिल्ला चितगाव भागातून निवडून आलो. माझ्याकडे मुक्तिफौज आणि कार्यालय यांच्यात संपर्क साधण्याची जबाबदारी आहे. "

वा ऽऽ वा. ग्रेट. इथे झोपून काम, अतींद्रिय शक्तीच्या माध्यमातून मुक्तिफौज आणि कार्यालय यांच्यात संपर्क साधत होता ?-हे माझं स्वगत.

त्याने काही प्रचारी भ ष्य करण्याआधीच त्याला आघाडीवरील आणि कोमिल्ला चितगावची परिस्थिती विचारली-बराच वेळ घुटमळून त्याने उत्तर दिले. "मी बऱ्याच दिवसात तिकडे गेलो नाही. त्यामुळे माहिती नाही " बिचाऱ्या मीर कासम चौधरीला पुढारी असून धड थापा सुद्धा मारता येत नव्हत्या. नाही तर आमचे रिपोर्टर आणि चीफ सेक्रेटरी पाकिस्तानी अत्याचारांची इत्थंभूत माहिती देत असतात.

मग मीर कासमने स्त्रिया-मुलांवरील पंजाबी अत्याचाराच्या कथा ऐकवण्यास सुरवात केली. आणि शेवटी म्हणाला या पंजाब्यांनी साक्षात कायदेआझमचा सुद्धा खून केला खून !

अरे बापरे, हे नवलच होते. प्रत्येक दुष्कृत्याला पंजाबीच जबाबदार होते तर.

तेवढ्यात बादशा म्हणाला-" दॅट ब्लडी वेस्टर्न कॉन्स्पिरेटर बरं झालं मारला गेला. " बादशाहचे हे बोलणे मात्र चौधरीच्या जिव्हारी लागले-" असं कसं-काही झाले तरी कायदे आझमांनी आपल्याला होमलॅण्ड मिळवून दिले आहे. त्यांना आपण मानलेच पाहिजे. "

चौधरीच्या-" कायदे आझमांनी आपल्याला होमलॅण्ड मिळवून दिले " या उद्गारातच मला बरेच काही मिळाले. मी बाहेर पडलो. उन्हं निवळत होती—

(क्रमशः)




अनंत देशमुख

नुकताच तो तुरुंगातून बाहेर पडला होता.

तुरुंगाच्या अधिकाऱ्यांशी फटकळपणे वागून अगोदरच त्याने गैरमर्जी संपादन केलेली. 'साब, तुम्हारे जैसे बहुत देखे हैं' म्हणून त्याने त्यांचा सरळ अपमानही केला होता. आणि म्हणूनच त्याला कित्येक वेळा खडतर शिक्षा होत असत. सतत काम केल्याने त्याची गात्र न् गात्र

पोरगी देखील आईच्या चालीवर गेली होती तर!
त्याचा अखेरचा आधार उन्मळून पडला होता.
तो बेफाम झाला......

---

शिगत असत. असल्या खडतर जीवनाला तो पार वैतागून गेला होता. मरीन ड्राईव्हच्या फुटपाथवर बसल्या बसल्या त्याची चांगली कमाई होत होती. रेस्टॉरंटच्या मालकासमोर नुसते उभे राहिले तरी देखील त्याच्या अंगावर पाव भिरकविण्यात येई. अशा मस्तवाल जीवनातून तो उठला होता. एक दिवस म्युनिसिपालिटीचे लोक आले आणि 'भागो, भागो, पकड जायेगे...' जीव मुठीत घेऊन तो धावत होता, शेवटी दंडुक्याचा पायावर प्रसाद मिळाला आणि मग पार थकून गेला. गाडीतून त्याला तुरुंगात आणण्यात आले. त्याच्याबरोबर इतरही लोक होते. प्रत्येकजण दैवाला बोल लावत होता. भयकर संकटात पडल्यासारखे त्यांना वाटत होते. काही काहींच्या दाढया पार वाढल्या होत्या. अंगावरची वस्त्रे फाटकी, तेलकट, मळकट. कुबट वास एकमेकाला बिलगून राहिलेला. सगळयांच्या डोळयांत रक्त उतरले होते. अंगार चेहऱ्यावर ओसंडून निघत होता.

ते सारे महारोगी होते.

आणि म्हणूनच तो तुरुंगातून पळाला होता. पुन्हा मरीन ड्राईव्हच्या फुटपाथवर त्याने नवीन संसार मांडला. एकाकी. एकटा.

त्या दिवशी त्याने अगदी निश्चय केला. दैव तर अगदी दैत्यासारखे पाठी लागलेले. अलिकडे त्याची कमाई देखील पुरेशी होईनाशी झालेली. क्षणाक्षणाला लोक त्याला ठोकरत होते. अगदी हीन अवस्थेत तो जगण्याचा प्रयत्न करीत होता. अखेर मनाचा हिय्या करून त्याने लोकल पकडली. जाण्यापूर्वी त्याच्याच शेजारी बसणाऱ्या कासमला त्याने सलाम केला. त्याचा बोटंविरहीत पंजा हवेत क्षणभर फडफडला. कासमनेही अनाहुतपणे त्याला 'खुदा हाफीज' केले आणि समोरच्या तिरळ्या केमिस्टच्या नावाने त्याने शिवी हासडली. अंगावरून जाणाऱ्या गुबगुबीत पारशी बाईकडे बघून तो पचकन् थुंकला. त्याचे विचार चक्र जोरात सुरू झाले. ईश्वरावरचा त्याचा विश्वास पूर्वीच साफ उडाला होता. 'बॉम्बे सेन्टर' येण्यापूर्वीच त्याने धाडकन् उडी टाकली. आसमंत भेदून टाकणारी एक किंकाळी बाहेर

पडली; आणि त्याच्या देहाची शकले उडाली. बाजूने धाड् धड् करीत विरार लोकल केव्हाच निघून गेली

चाळीशीतच त्याला महा रोगाने पछाडले. प्रथम प्रथम तो घरात राही. नोकरीतून त्याला काढून टाकण्यात आलेले. पाच सहा पोरांचा बोजा बायको कसाबसा सांभाळत होती. वेळेवर भाकरीचा तुकडा समोर फेकत होती मोटा असलेला किश्या पारावरल्या गँगमध्ये सामील झालेला. गांजा, चरस यांच्या तंद्रीत नित्य गुंगलेला. नाही म्हणायला बायको तरी प्रथम विचारत असे तेवढे तरी समाधान होते.

रोग पसरत गेला. पोरे घरातून पसार व्हायला लागली. त्याची बायकोही पार बदलली. नवऱ्याच्या, मोठ्या मुलाच्या नावाने बोटे मोडायला लागली. एका संध्याकाळी ती तोऱ्यातच आत आली. मागाहून मोहल्ल्याचा दादा विसबा आला चार दोन मंडळी बरोबर घेऊन.

गोदीच्या–त्याच्या बायकोच्या उफाडच्या अंगाकडे नजर एकवटून तो बोलला:

" काय गे गोदे. कश्यास निरूप धाडलास ?"

" आस म्होरे या; उभ्या उभ्या निर्णय घेण्याजोगा विषय न्हाय."

विसबा चकिडवा बसला. गोदीवरची त्याची नजर अजून सुटली नव्हती.

" आता बगा. तुमी जानताच. ह्यो आसलं मानूस किती दिस घरात ठवायचं ?"

" मग तुज म्हननं तरी काय ?"

गोदी गप्प बसली.

" घोवाक बाहेर घालवतेंस ?"

" तिचा बी खरा हाय. तुमी बी इचार करा. इतली पोरं. किती आनी कशी पोसायची हो ? शिवाय बाई मानूस. आनी यांचं बी सगळ्यांक भ्या वाटता." दुसरा म्हणाला.

विसबाने त्या दिवशी त्याला फार दम दिला " घर सोडून जा; नाहीतर चिंध्या चिंध्या करीन."

तो दिवस त्याच्या आयुष्यातला आणखी एक महत्वाचा दिवस ठरला. पुरुष जातीने पाहू नये ते ते सारे तो डोळ्यांवर पडदा ओढून पाही समोर पडले तर खाई. नाहीतर देहाची घडी करून पडे.

विसबा तर रात्रंदिवस गोदीकडेच असायचा.

गोदीदेखील त्याला साद देत होती. आणि हा डोळे मिटून सारं पाहत होता. आता पोरांच्या अंगावर देहभर कापडं आली होती. आषाढातल्या एका रात्री विसबा तर्रर–होऊन आला होता. दार उघडले गेले; आणि एका हातात गोदीला घेत त्याने त्याला हिसकले होते. ' उद्याच्या उद्या चालता हो, नाहीतर जिवानिशी जाशील.

पडत्या पावसात त्याने घर सोडले होते.

पावसाने त्याचे अंग शहारले. एक, दोन थेंब चेहऱ्यावरून ओघळले आणि ग। वाढलेल्या दाढीवर स्थिरावले. भित्र्या नजरेने त्याने इकडे तिकडे पाहिले. आपो-आपच त्याची जीभ ओठावरून फिरली. समोर निःशब्द चित्र उभे होते. नाही म्हणायला टार रोडवरून जाणाऱ्या एखाद्या मोटरचा फर्र् आवाज प्रमाणापेक्षा मोठा वाटत होता. म्युनिसिपालिटीच्या दिव्याभोवती डासाचे मोहोळ उठले होते. लांबवरून एखाद्या कोळश्याच्या गाडीची प्रदीर्घ किंकाळी ऐकायला येई. कुत्र्याचे भुंकणे देखील कमी झालेले. गुढग्या गुढग्या पाण्यातून तो रस्ता पार करीत होता. कशीबशी त्याने रेल्वेलाईन ओलांडली; आणि सगळ्या देहाचे गाठोडे करून तो धावत राहिला. झोपडपट्टीच्या टोकाला बसलेल्या चौकडीत काहीसे खलबत चालले होते. त्यांना पहाताच तो थरकापला. मध्येच कुणी एकाने खाकरल्यासारखे केले. पाहिले तर धिप्पाड अंगाचा अब्दुल उभा होता. धंदा करायचा.

' हरामखोर साला, इतने रात कु चला है. '

जमिनीवर धाडकन् दांडका आपटल्याचा स्पष्ट आवाज त्याने ऐकला. जीव मुठीत घेऊन तो धावत सुटला.

पलिकडल्या फुटपाथजवळ एक मशिद पावसात न्हाऊन निघत होती. कसातरी त्याने तिचा आसरा घेतला; आणि सारी रात्र जागून काढली. चेहऱ्यावरून त्याने पंजा फिरवला. डोळ्यांच्या खोबणीतून अश्रू ठिबकत होते अतिशय दुःखाने त्याने अंगावरच्या फाटक्या, मळक्या, कुबट शर्टची बाही तोंडात घातली. उष्ण उष्ण अश्रू त्याच्या हाताच्या पंजावर पडत होते.

अशा अवस्थेत त्याला कासम भेटला. कासम. बटबटीत डोळ्यांचा, विस्कारलेल्या झिज्या असलेला. राकट, समदुःखी. कासमदेखील लेप्रसीचा बळी होता आणि म्हणूनच कासमने त्याला लिबर्टीपाशी आणून सोडले. थोडी कमाई व्हायला लागली. फुटपाथचा आसरा मिळाला. पण संसार सुटला तरी माया सुटली नाही वात्सल्याचा उमाळा त्यालाही येई. तो कळवळून येई. तो त्याच्या मुलीसाठी. पाच भावंडात एकुलती. लहानपणापासून त्याने तिला फुलासारखी जपली बायकोविषयी त्याला घृणा वाटू लागली. मुले बदफैली निघाली. दहा वर्षाचे चिमुरडे पोरदेखील दारूच्या ट्यूब्ज नेत असताना जेव्हा त्याने पाहिले तेव्हा त्याच्यातला बाप गहिवरला.

तुरुंगातून पलायन केल्यानंतर तो कासमला भेटला. त्याच्या मोठ्या मुलाला पोलिसांनी कैद केल्याचे कासमनेच प्रथमच सांगितले. खुनाच्या वहिमावरून ती चांडाळचौकडी पकडली गेली. विद्ध मनाने तो जगत होता.

आपल्या लाडक्या मुलीला डोळे भरून पहावे म्हणून तो दबकत दबकत मोह-ल्ल्यात आला; काळोखाची पावलं हळूहळू पडत असताना. प्रत्येकजण धंद्यात मग्न असताना, तो झोपडीपाशी आला. एकदम त्याचा धीर खचला. त्याला आठवला

आडदांड, क्रूर विसबा. त्याचे बोल : निठ्या निठ्या करीन; त्याची आडव्या अंगाची बायको–डोळे फाडफाडून बघणारी. क्षणभर तो रेंगाळला. आणि बेभान होऊन वारा प्यायलेल्या पाडसासारखा धावत सुटला. भीतीने त्याचे सर्वांग कापत होते दिव्यांच्या लख्ख प्रकाशात येताच त्याने आपले तोंड झाकले. कुणाला संशय यऊ नये म्हणून तो चोरपावलांनी रस्त्याच्या कडेने चालला.

डोक्यात वीज चमकली.

पोटात वात्सल्य दाटून आले. पावलं माघारी फिरली.

झोपडीच्या फटीतून त्याने पाहिले. चिमणीचा क्षीण प्रकाश पसरला होता. चुलीवर कालवण खळाळत होते. बाहेरचा काळोख त्याला बोचरा वाटला. कुडाला टेकून त्याची लेक कलंडली होती. विसबाचा विळखा तिच्या भोवती पडला होता.

त्याच्या डोळ्यावर ताण पडला. डोकं बधीर झाले. पोरगीदेखील आईच्या चालीवर गेली होती तर ! त्याच्या जीवाचा अखेरचा आधारही उन्मळून पडला. तो बेफाम झाला. एकदा विसबाचे नरडे दाबावे असेही त्याला वाटले. त्याच्या अंगातली सारी शक्ती गोठली. बधीर झाली.

...रीतसर पंचनामा झाला तेव्हा पोलीस ऑफिसर बोलला : साला सुसाइड किया है. भडव्चोद.

□ □ □

## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे दर

| | | | |
|---|---|---|---|
| पाच वर्षे : | १००–०० | वार्षिक : | २५–०० |
| तीन वर्षे : | ६०–०० | सहामाही : | १५–०० |
| दोन वर्षे : | ४५–०० | परदेशी जलमार्गे वार्षिक : | ४५–०० |

□ २२ ऑगस्ट १९७० नंतरच्या ज्या वर्गणीदारांनी रुपये तीस वार्षिक वर्गणी पाठविली आहे त्यांची वर्गणीची मुदत तीन महिन्यांनी वाढवून घेतलेली असून त्याप्रमाणे नोंदवहीत फेरबदल करण्याचे काम चालू आहे.

□ नवीन वर्गणीची रक्कम शक्यतो ड्राफ्ट वा म. ऑ. ने पाठवावी. कार्यालयात रोख भरणा करण्यासही हरकत नाही. चेकनेच रक्कम पाठविणे सोयीचे वाटल्यास बँक कमिशन एक रूपया अधिक हिशोबी धरावे

□ चेक, ड्राफ्ट ' साप्ताहिक माणूस ' या नावावर पाठवावा.

□ पत्रव्यवहार करताना आपला वर्गणीदार क्रमांक शक्यतो कळवावा.

कारेकरांची कविता तशी ग्रेट, महान नाही. पण 'चालू' कवितेत ती चांगली आहे. 'आपण कविता आहोत' याची तिला निदान जाणीव आहे.

पुस्तके

# मी सूर्य मुक्त

आनंद यादव

साहित्य-स्वातंत्र्याचा हा काळ आहे. त्यामुळे साहित्य-विषयक हक्कांची भली-बुरी जाणीव सर्व साहित्य-संबंधीतांमध्ये वाढीस लागलेली आहे. रान माजत आहे. अशा माजणाऱ्या रानात कुणाची वाढ कशी होईल हे सांगता येत नाही. या वाढीची फळे नव्या, चालू साहित्यात निर्माण होत आहेत. आपल्या किंवा आपल्या गँगच्या, ग्रूपच्या लेखनाची सामुदायिक प्रसिद्धी करणारी अनियतकालिके, प्रकाशने तेवढ्या तेवढ्यापुरती निर्माण होतात. आपले लेखन प्रसिद्ध झाले की संपले; या पलिकडे त्यांचा काही हेतू दिसत नाही...गवत माजते आणि उन्हाळा आला की वाळून जाते. नव्या गवताकडे पुन्हा चार दिवस उत्सुकतेने पाहावेसे वाटते. या गवताकडे कौतुकाने पाहणारे समीक्षकही त्याच्या पलीकडे फारसे काही पाहत नाहीत. 'नव काही तरी उगवलंय' एवढ्या उत्सुकतेतच ते धन्यता मानतात.

पण या धमालीतही काही चांगले, रसरसलेले अंकुर सापडतात. त्यांच्याकडे या टेंपररी हिरवळीमुळे अनेक वेळा दुर्लक्षही होते...विजय कारेकर यांच्या कवितेबाबतीत असे तर होणार नाही ना ? असा प्रश्न त्यांची कविता वाचून मनात निर्माण होतो. आपण आपल्या अनुभवांना प्रमाण मानून मनःपूर्वक लिहित राहावे हे

खरे: पण त्याची मनःपूर्वक जोपासना इतरांनीही करणे आवश्यक वाटते. धमालीच्या काळात ही काळजी अधिक घेणे उभयपक्षी जरूर आहे.

कारेकरांची कविता तशी महान, ग्रेट वगैरे नाही. पण ती 'चालू कवितेत' चांगली आहे. तिला 'आपण कविता आहोत' याची निदान जाणीव आहे. अनुभवांना अनुभव म्हणून प्रमाण मानून ती व्यक्त होते. तिचे शब्द, प्रतिमा, आकार हे यथार्थ रूप घेऊन जन्मताना दिसतात. चालू पिढीतील अनेक कवितांप्रमाणे शब्दाशब्दांना, प्रतिमाप्रतिमांना तिने जन्मताच लाऊडस्पीकर बांधलेले नाहीत. लाऊडस्पीकर तोंडात घेऊन जन्मापासूनच ओरडा करणाऱ्या चालू कवितेच्या या काळात म्हणूनच त्यांच्या कवितेचा स्वाभाविक सूर लक्ष देऊन ऐकणे आवश्यक आहे.

कारेकरांच्या कवितेला तिचे प्रश्न सुटलेले नाहीत. किंवा जगाच्या आईचा उद्धार करून, पोटभर शिव्या देऊन ती आपले प्रश्न सुटतील असेही मानणारी नाही. प्रस्थापितांवर थुंकले, त्यांच्यासमोर बोंबा मारल्या, शब्दांच्या, प्रतिमांच्या, भाषानियमांच्या खुर्च्या आणि टेबले मोडली म्हणजे आपला विजय झाला असल्या बालीश कल्पनांवरही ती खूष नाही. 'आम्हाला समजून घ्या'चा अकारण डायरियाही तिला झालेला नाही. कारण तिला प्रामाणिकपणे वाटते की, आपल्यासमोर उभे असलेले प्रश्न तेवढे साधे, बाळबोध नाहीत. तिच्याभोवती सध्या प्रश्नांच्याच साखळ्या उभ्या आहेत. त्यांनी ती मनातून हलून गेलेली आहे.

आपण एक शापभ्रष्ट सूर्य आहोत, आपले तेज कुठेच पडत नाही, उलट आसपासच्या वातावरणात दाटलेल्या अनेक सूर्य-मुक्त सावल्यांचे प्रचंड वजन आपल्यावर पडत आहे; याची तिला विशेष जाणीव होते. आपण शापभ्रष्ट का झालो, या सावल्यांचा अर्थ काय, त्यांचा आपला नेमका संबंध काय; या प्रश्नांचा उलगडा अजून तिला होत नाही. अजून त्या अवस्थेत ती आलेली नाही. मात्र–

" ...वलयांकित अंधारातला
काळा सूर्य
जागवित कळ्याफुलांना
जागवित आपल्या धन्यांना
जागवित स्वरांना
सतत–
'तुम्ही तरी सूर्य-बद्ध व्हा.' "

अशी भाबडी अपेक्षा ती करते. हा भाबडा आशावाद तिला शोभून दिसणाराच आहे. प्रश्न सुटेनासे झाले किंवा ते सोडवण्याची कुवत संपली की भाबडा आशावाद निर्माण होतो.

मात्र ती आपल्याला प्राप्त असलेल्या इंद्रिय-संवेदनांच्या काजव्यांच्या क्षुद्र

प्रकाशात जगताना त्या अनुभवकाळापुरती तृप्त असते.

" काजव्यांचा अर्थ
संवेदनांचे जग जागवणारा,
काजव्यांचा प्रकाश
संवेदनांची फुले उमलवणारा.
प्रकाशाची लुकलुकती सुरावट
अंगांगावर मोहोरले वृक्ष.
' मी मोहोरल्या वृक्षांच्या स्वप्नांत. '

असे एक क्षुद्र पण तिच्यापुरते सत्य असलेले मोहरणे भोगण्यात ती कमीपणा मानत नाही.

' तुला विवस्त्र पाहिले तेव्हा
माझ्या मनाचे मांस झाले.
त्याला
आतून धमन्यांचे झाड फुटले. '

हे ती प्रामाणिकपणे मान्य करते. ' मनाचा मोर, त्याचा पिसारा ' इ. फसवा पसारा करून आपला खोटा डौल वा मोठेपणा प्रदर्शित करीत बसत नाही. म्हणूनच ती ' प्रीत ' वगैरेसारख्या तथाकथित दिव्य गोष्टींना आपल्यापुरते वास्तव आणि काहीसे उपरोधी उत्तर देऊन मोकळी होते.

" तुझी माझ्यावर प्रीत आहे;
सिंह मांडीवर लोळत आहे.
तू कुठायस ? मी कुठाय ?
ससे छातीवर लोळत आहेत.
तुझ्या गोष्टीतली बासरी कुठाय ?
मांडीवर तुझा सूर्य देठ फुलताय.
तुटणारे तुझे हृदय कुठाय ?
मांडीच्या कात्रीत प्रीत शब्द तुटताहे. "

या कवितेतील प्रश्न आणि त्यांची उत्तरे त्या दृष्टीने पाहण्यासारखी आहेत.

ही वृत्ती कोवळी आहे हे खरे. पण ती स्वतःशी प्रामाणिक आहे; हे फार महत्त्वाचे आहे. निदान आलेले क्षुद्र अनुभव वेगळे आणि व्यक्त झालेले काव्यात्म अनुभव वेगळे; अशी दांभिक प्रतारणा ती कधीच करीत नाही. तिने ही जपलेली आत्मनिष्ठा चालू पिढीत यथास्वभाव पाहायला मिळते का ? काजवेही आत्मनिष्ठ असू शकतात, हे सांगणारी कारेकरांची कविता म्हणूनच वैशिष्ट्यपूर्ण वाटते.

'भोंडला', 'धिक्-सूर' यासारख्या कविता या दृष्टीने सबंध पाहण्यासारख्या आहेत.

अस्तित्वाचा प्रचंड प्रश्न तिला पडतो. आणि त्या प्रश्नाचे उत्तरही ती तिच्या पुरते देऊन मोकळी होते. पण हे उत्तर म्हणजे अस्तित्ववादापुढे उभा केलेला एक तिरका प्रश्न आहे. 'द प्रॉब्लेम ऑफ एक्झिस्टन्स' ही कविता त्या दृष्टीने प्रत्यक्ष पाहण्यासारखी, वाचण्यासारखी आणि ऐकण्यासारखीही आहे. 'एक एक एक एक' असे शब्द असलेल्या एकूण आठ ओळी आहेत. या ओळी आरंभी जाड टाईपात आहेत. त्यानंतर पुढच्या पुढच्या ओळीत टाइप लहान लहान होत जाऊन 'एक' बारीक बारीक होत गेल्याचा आभास निर्माण झाला आहे. नंतर तर एका कडव्याची जागा कोरी सोडून 'एक'चे अस्तित्वच संपुष्टात आल्याचे दाखवून शेवटी आरंभीच्या इतक्याच जाड टाइपात "'आयला' एक कुठं गेला ?" असा प्रश्न उपस्थित केला आहे. प्रारंभी प्रचंड वाटणारा 'एक' नंतर विचार करता दृश्य, श्राव्य आणि अस्तित्व या सर्वच दृष्टींनी नाहीसा होतो. त्या दृष्टीने या कवितेत वापरलेल्या टाइपाचा दृश्य परिणाम, कारेकरांचे या कवितेचे वाचन, तिची मांडणी हे सर्व प्रत्यक्ष अनुभवण्यासारखे आहे.

अस्तित्वाचा प्रश्न कारेकरांच्या कवितेला तिच्यापुरता सुटलेला वाटतो :

'मातीवर
मातीचेच नाव असते.
मातीला
मातीचेच मन असते.'


# व्होल्गा जेव्हा लाल होते

**ले. : वि. स. वाळिंबे**

**मूल्य : अठरा रुपये**

**राजहंस प्रकाशन**

असे ती होकारार्थी पद्धतीने उत्तर देते. तर कधी—

'कुणीच नसते
म्हणून एक ध्वनी येतो.
तेवढीच सोबत म्हणून
स्वतःच शब्द होतो.

'मी.'—असे मीच्या अस्तित्वाचे उत्तर तिने दिलेले असते.

या मातीच्या मनापलीकडे जे काही रंगदार जग पाहतात त्यांना या कवितेने निकालात काढले आहे. ती एक 'स्टाईल' आहे असे तिला वाटते. जन्म-मृत्यू आणि सौंदर्यानंद व इंद्रियानद या गोष्टी तिला मानवी अस्तित्वात अटळ वाटतात. त्या दृष्टोने शेवटची क्र. ३२ ची कविता अनुभवण्यासारखी आहे.

काव्यानुभव व्यक्त करताना कारेकरांना शब्दमाध्यम अपुरे वाटत असावे. म्हणून त्यांच्या रेघांवर अक्षरांचे पक्षी येतात नि उमजण्यापूर्वीच उडून जातात; शब्द म्हणजे पर्यायाने काहीच नाही असे त्यांना वाटत असावे. तरल अनुभव पकडण्याच्या प्रयत्नातही असे कित्येक वेळा माध्यम तोकडे पडते. कित्येक वेळा आपणाला ते अनुभवानुसार वाकविता येणे कठीण जाते; याचाही तो परिणाम असणे शक्य आहे. कोणतीही शक्यता नाकारता येत नाही. शब्द माध्यमाची ही मर्यादा जाणूनच की काय कारेकर चित्र-रेखांकडे वळतात. प्रस्तुत संग्रहात त्यांनी समाविष्ट केलेली दोन रेखाटने आणि मुखपृष्ठावरीलही रेखाटन ही कवितेच्या पार्श्वभूमीवर अर्थपूर्ण वाटतात. ती बरेच काही त्यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या जीवनप्रेरणांविषयी सांगून जातात. — असे असले तरी त्यांच्या शब्दांची जाणीव, प्रतिमा या सहज स्फुरलेल्या, स्वाभाविक अशा वाटतात. त्यांच्या कवितेला अकारण पसरलेला, विस्तीर्णतेचा आभास निर्माण करणारा अंतर्बाह्य विस्तार सोसतच नसावा असे त्यांच्या कवितेच्या घाटावरून वाटते.

परीक्षणाच्या जागेची मर्यादा लक्षात घेऊनच कारेकरांच्या कवितेचा हा स्थूल परिचय करून दिला आहे. शिवाय अजून ही कविता वाढावयाची आहे, विकसीत व्हायाची आहे. समृद्धी तिला आत्मसात करून घ्यावयाची आहे. असे दिवस तिला लाभावेत असे मनापासून वाटते. कारण तिच्या शक्यता फार मोठ्या आहेत. मोठ्या नम्रपणाने अनेक गोष्टी तिने नाकारलेल्या आहेत. या नम्रतेमुळेचे आक्रस्ताळ्या चालू कवितेत कदाचित तिचा नकार, तिचा विद्रोह आणि तिचे स्व-रूप लक्षात यायला वेळ लागेल.

२२ मे १९७१

नव्याची नवलाई तशी संपली आहे.
सम्राट अशोक भारतात येऊन आता जुने झाले आहेत.
तरी पण त्या सम्राटाचं इथे येणं, त्याची श्रीमंती,
त्याची भव्यता, त्याचा खर्चिक स्वभाव
यावर बऱ्याच चर्चा चालू आहेत.

# उडता महाल

**विजय वैद्य**

लहान मुलांसाठी असणाऱ्या वाङ्मयात राजाराणी असतात, आवडत्या राण्या असतात, एखादा वाईट माणूस असतो, राक्षस असतो, खूप खूप जादूही असते आणि एका रात्रीत बांधून होणारा महाल असतो, कधी कधी हा महाल उडता असतो. अशा गोष्टी वाचताना मुले रगून जातात. ही स्वप्नसृष्टी प्रत्यक्षात अवतरली तर !! ?

उडता महाल आता स्वप्न सृष्टीत न राहाता प्रत्यक्षात अवतरलेले सत्य आहे. हा महाल अत्याधुनिक आहे. अस्सल भारतीय वातावरण त्या महालात आहे. महालाच्या अंतर्भागात कृष्णाच्या लीला, क्रिडांवर आधारित त्याचप्रमाणे अंजठाच्या हुबेहुब प्रतिकृती म्हणता येतील अशी अप्रतिम चित्रे चितारलेली आहेत. उमर खय्यामचो सुप्रसिद्ध सुरई तेथे सुंदरींच्या हाती असते. सुमारे सोळा सुंदरी सेवेसाठी हाजिर असतात. अगदी हाताजवळ असलेली कळ दाबताच मोठ्या अदबीनं एखादी सुंदरी जवळ येऊन, मी आपली काय सेवा करू शकेल हे गोड आवाजात विचारते. महालात खानदानी भोजन, सर्वोत्कृष्ट भारतीय व पाश्चात्य संगीत वा सिनेमा पहाण्याची सोय आहे आणि हे सर्व अगदी बसल्या जागी. मुलांसाठी खेळण्याचे विश्वही आहे हे सर्व चालू असतानाच महाल सुमारे ६०० मैल वेगाने उडतो. एका देशातून दुसऱ्या देशात (किंवा एका विश्वातून दुसऱ्या विश्वात) जात असतो.

हा उडता महाल आहे ७४७-१३७- बी जातीचे बोईंग विमान, जम्बो या नावानेच ते अधिक प्रसिद्ध आहे.

प्रवासी वाहतुकीसाठी असलेले सर्वात मोठे विमान म्हणजे जम्बो. बोईंग ७०७ जातीची तीन विमाने एकत्र केली तरच भव्यतेच्या बाबतीत ती जम्बोच्या आसपास जाऊ शकतील.


२३१ फट ४ इंच एवढी जम्बोची लांबी आहे. जम्बोचे प्रचंड धूड एखाद्या फुटबॉल मैदानाचा ⅓ भाग व्यापते आणि जमिनीपासून विमानाच्या शेपटाकडील सर्वात उंचावरील टोक ६३ फूट ५ इंच उंचीवर आहे. म्हणजेच ते सहामजली इमारती एवढे उंचीला आहे. एकूण २० टन वजन जम्बो लीलया घेऊन जाऊ शकते (बोइंग ७०७ पाच टनांपेक्षा अधिक वजन घेऊन जाऊ शकत नाही.)

या विमानात एकूण ४९० प्रवासी घेऊन जाण्याची व्यवस्था करणे (सर्वच्या सर्व इकॉनॉमी क्लास) शक्य आहे पण एअर-इंडियाच्या जम्बोमध्ये फर्स्ट व इकॉनॉमी क्लासची व्यवस्था आहे. त्यामुळे ही व्यवस्था ३४६ प्रवासी एवढीच आहे. त्यापैकी ५८ प्रथम वर्ग व २८८ इकॉनॉमी वर्ग अशी जागांची वाटणी आहे. (७०७ मधून फक्त १३२ प्रवासी जाऊ शकतात.)

जास्तीत जास्त ७७५,००० पौंड वजन जम्बो नेऊ शकते किंवा एकूण ३७१ प्रवासी आणि ४०,००० पौंड माल घेऊन सुमारे ६०० मैल वेगाने कोठेही न थांबता पाच हजार मैलांचा पल्ला गाठणे जम्बोच्या दृष्टीनं 'किस झाडकी पत्ती' आहे. एका जम्बोची किंमत सुमारे १९ कोटी रुपये आहे. एवढ्या रकमेत एक हजार खोल्या असलेले अत्याधुनिक सुखसोईंनी सुसज्य असे बडे हॉटेल बांधता येईल.

१९७० च्या सुमारास प्रवासी वाहतूक व माल वाहतुकीत प्रचंड वाढ होईल या अंदाजाने १९६० सालीच सिअॅटल येथे बोईंग कंपनीने संशोधनाला सुरुवात करून १५० कोटींची गुंतवणूक केली आणि १९६७ साली सर्व तयारी पूर्ण होऊन उत्पादनाला सुरुवात झाली. २१ जानेवारी १९७० रोजी जगातील पहिल्या जम्बोने उड्डाणासाठी आकाशात झेप घेतली.

एअर-इंडियाचेही जम्बो युग ६७ च्या मार्च मध्ये सुरू झाले. त्या वर्षीच्या मार्चमध्ये एअर-इंडियाने ४ जम्बोंसाठी ऑर्डर दिली, त्यासाठी १०० कोटी रुपयांची गुंतवणूक केली. हे कर्ज अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इम्पोर्ट बँक आदिकडून मिळविण्यात आले. गेल्या ३३ वर्षात एवढी प्रचंड गुंतवणूक एअर-इंडियाने केली नव्हती. १९६७ सालापासून एखाद्या लष्करी मोहिमेच्या थाटात जम्बोच्या आगमनाच्या दृष्टीने सर्व तयारी सुरू झाली. विमानतळाची वाढ करणे-कारण ३४६ प्रवासी एकाच विमानातून उतरले तर कस्टम्स्, पासपोर्ट आदि कामे झटपट उरकता आली पाहिजेत, धावपट्टीत सुधारणा, वैमानिक व इतरांना प्रशिक्षण आदिच्या सोई, महाकाय जम्बो ठेवायला तसाच मोठा हँगर-जम्बासाठी मुम्बईत तयार होणारे


मिळवा
4%
4 टक्के
करमुक्त व्याज मिळवा
टपाल कचेरींतील बचत बॅन्क
खात्यावर
ठराविक रक्कम 2 किंवा 3 वर्षे तशीच ठेवल्यास
4½% टक्के
तपशीलासाठी नजीकच्या टपाल कचेरीत चौकशी करा
राष्ट्रीय बचत संघटना

davp 70/683

हँगर्स आशियातील हाताच्या बोटांवर मोजता येथील इतक्या थोड्या, प्रचंड हँगर्स पैकी होत. ३३० फूट लांब, २७० फूट रुंद, व ९२ फूट उंच. प्रत्येक हँगरचा बांधणी खर्च १४० लाख. शिवाय, दुरुस्ती मेंटेनन्ससाठी ५२,००० चौरस फूट जमिनीवर मोठा वर्कशॉपही सुसज्ज आहे. वैमानिक व विमानातील इतर नोकर वर्गाला प्रशिक्षण देण्यासाठी सांताक्रुझ येथे १५ लाख रुपये खर्च करून ७४७ ची हुबेहूब प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. आतील सारे वातावरण खऱ्या जम्बोसारखे.

७४७ च्या अंतरंगात ए. बी. सी. डी. इ. असे विभाग आहेत ए. व बी. प्रथम वर्गासाठी व बाकी तीन इकॉनॉमी वर्गासाठी. ही पाच कॅबिन्स १८६ फूट लांब, २० फूट रुंद आणि १० फूट उंच आहेत प्रत्येक विभागात २२"×६६" आकाराचे चित्रपटांसाठी पडदे आहे. शिवाय सुप्रसिद्ध भारतीय व पाश्चात्य शास्त्रीय संगीत गायक व वादकांच्या संगीताची लयलूटही तेथे उपलब्ध आहे. दोन्ही प्रकारचे संगीत प्रवाश्यांना उपलब्ध करून देणारी एअर-इंडिया ही एकमेव कंपनी आहे. छोट्या प्रवाश्यांसाठी कळसूत्री ठक्यांचे विश्वही सदैव हात जोडून तयार असते.

जम्बोचा फ्लाइट डेक – कॉकपिट – प्रवासी कॅबिनच्या वर आहे. (फस्ट क्लॉस कॅबिनच्या वर) त्यामागे महाराजा लाउंज आहे. खाली असलेल्या प्रथम वर्गाच्या प्रवाशांसाठीच हा लाउंज असून तो एका गोलाकार जिन्याने जोडलेला आहे. तेथील वातावरण हुबहुब अजंठाचे. तेथून कोणाही रसिकाचे पाय खाली येण्यासाठी निघणे जडच. अशा प्रकारचा अप्परडेक वा लाऊज असलेली एअर-इंडिया हा एकमेव कंपनी. या लाऊंजमध्ये १५ प्रवाश्यांची व्यवस्था असून त्या बेहोश वातावरणात बेहोशीचा गहिरेपणा आणणारी मदिराही तेथे मिळ शकते. जमिनीपासून सुमारे आठ मैलांवरील मद्यपानाची ही आगळी गम्मत येथे प्रवाश्यांच्या सेवेशी असते. खानदानी, राजस्थानी वेश व केशभूषा केलेली हवाई-सुंदरी. मात्र हा शोक प्रथम वर्ग प्रवाश्यांसाठीच. एखादा व्ही. आय. पी. ज्यावेळी प्रवास करीत असेल त्यावेळी ह्या महाराजा लाउंजचे खास कॅबिनमध्ये रुपांतर करता येते.

एकूण १६ हवाई सुंदरी प्रवाश्यांच्या सेवेसाठी असून महाराजा लाऊंजमधील राजस्थानी वेशभूषा सोडता बाकीच्या हवाई सुंदरी साड्या व पंजाबी धर्तीचे चुणीदार खमिज असा पेहराव करतात. तर फ्लाईट पर्सरसाठी नेहरू जॅकेटसारखे सिल्कचे जॅकेट असा युनिफॉर्म आहे.

हवाई वाहतुकीच्या इतिहासात जम्बोइतका आरामशीर प्रवास कधीच आढला गेला नव्हता. आतापर्यंत जगातील सुमारे २० हवाई कंपन्यांकडे ७४७ जातीची विमाने आहेत. त्यांच्या अंतरंगातील सजावट जवळजवळ सारखी आहे. तरीही प्रत्येक कंपनीने इतरांपेक्षा काहीतरी वेगळे करण्याचा प्रयत्न केला आहे खरा, पण एअर-इंडियाची ७४७ जम्बो, सजावट, कलाकुसरीने परिपूर्ण असून त्याचे वर्णन 'फॅंटास्टिक' असेच केले जाते. एअर-इंडियाच्या जम्बाने प्रथम प्रवास करणारा कोणताही

प्रवासी आतील खास भारतीय वातावरण पाहून दिपून जातो. (कृष्णाच्या जीवनावरील सुंदर चित्रे, अजंठाची चित्रे विमानाच्या आतील भागात सर्वत्र खिडक्यांवर रंगवलेली आहेत शिवाय दक्षिणेत मिळणाऱ्या पंचधातूप्रमाणे असणाऱ्या सुंदर मूर्तीही जागोजाग आहेत. कोणीही ही सजावट पाहून मोहून व दिपून जावे.) विमानाच्या बाहेरील बाजूची रंगसंगती नेहमीची आहे पण खिडक्यांवरील रंगकाम

## जगातले ७४७ वे आश्चर्य

■ एप्रिलच्या १८ तारखेला एअर-इंडियाचे पहिले जम्बो आले. त्याचे नाव 'सम्राट अशोक'. अमेरिकेच्या पश्चिमेकडील सिॲटल येथील बोईंग कारखान्यात तयार झालेले जम्बो, तेथून न्यूयॉर्क, लंडन, रोम व रोम ते मुंबई कोठेही न थांबता ११००२ हवाई मैलांचा प्रवास करून आले. यासाठी लागलेला वेळ २० तास ५० मिनिटे. विमानतळावर २० हजार लोक स्वागताला उपस्थित होते.

■ हे विमान सांताक्रुझ येथे जेथे उभे करण्यात आले होते त्याच्या जवळच एअर-इंडियाचे 'नंगा पर्वत' नावाचे ७०७ बोईंग उभे होते पण ते ७४७ पुढे अगदी थिटे व जुनाट वाटले. हेच विमान काल-परवापर्यंत आकाशातील महाल समजले जात होते.

■ एअर-इंडियाच्या ७०७ बोईंग विमानांना हिमालयातील पर्वत शिखरांची नावे देण्यात आली होती. (एव्हरेस्ट, कांचनगंगा, धवलगिरी, नंगा पर्वत. दहा विमानांना दहा नावे) तर ७४७ विमानांना सम्राटांची नावे देण्यात आली आहेत. अर्थातच ती त्यांना शोभेशीच आहेत. सम्राट अशोक, सम्राट शहाजहान, सम्राट चंद्रगुप्त मौर्य व सम्राट अकबर.

■ महाराष्ट्राचे राज्यपाल नबाब अलियावर जंग 'सम्राट अशोका'चे स्वागत करताना म्हणाले, 'दी महाराजा हॅज गिव्हन बर्थ टू ॲन एम्पोरर.'

■ श्री. जे. आर. डी. टाटा, एअर-इंडियाचे अध्यक्ष म्हणाले, 'या विमानांत इलेक्ट्रॉनिकची एवढी प्रचंड सामुग्री आहे की, वैमानिकाला ते चालवावेच लागत नाही. आता वैमानिक फक्त प्रवाशांच्या करमणुकीसाठीच नेमावे लागतील.

■ जम्बोचे तांत्रिक नाव ७४७-२३७ बी आहे. हे विमान खरंच आश्चर्यकारक आहे. एअर-इंडियाने या विमानाची जाहिरात जगातील ७४७ वे आश्चर्य असेच केले आहे.

जयपूरच्या सुप्रसिद्ध ' हवा महल 'च्या झरोक्याप्रमाणे आहे.

विमानाचा होणारा आवाज कमी करणे महत्त्वाचे होते आणि ते काम JT9D 3 AW या सुधारित इंजिनाने केले आहे. ही इंजिन्स ४५००० पौंड एवढी शक्ती निर्माण करू शकतात. जम्बोचं प्रचंड धूड टेक-ऑफसाठी उचलायला लागणारी मिनिटाला ३,३५,००० पौंड एवढी हवा वा ररात येते. या एका इंजिनची किंमत १ दशलक्ष डॉलर्सपेक्षा अधिक आहे. पण येथील वर्कशॉपमध्ये आपले तंत्रज्ञ याही इंजिनात सुधारणा करून ती JT9D–7W प्रकारची करणार आहे.

या इंजिनाचे आणि एक वैशिष्ठ म्हणजे इंधनाचा कमी वापर यामुळे विमानाचें वजन कमी होते. शिवाय विमानाचा खर्च (ऑपरेटिंग कॉस्ट) इतर कोणत्याही विमान.पेक्षा कमी आहें. (जवळ जवळ २५ ते ३० टक्के कमी आहे.)

जम्बोचे वजन ७०७ किंवा DC–8 जातीच्या विमानापेक्षा कितीतरी पटीने वाढूनही उड्डाण करायला लागणारी धावपट्टी या विमानाला कमीच लागते याचे कारण विमानाच्या पंखामध्ये बसवलेली खास यंत्रसामुग्री हे होय.

७४७ विमानाला एकूण १८ चाके असून दोन पुढे (ज्याला नोज गिअर असे म्हणतात) आहेत आणि बाकी १६ चाके मागच्या व मधल्या भागात चार चाकाचा एक गट अशा चार गटात विभागली गेली आहेत.

जम्बोच्या पहिल्या प्रवासी उड्डाणापासून एक वर्षाच्या काळात जगातील सुमारे १०० जम्बो विमानांनी सात दशलक्ष प्रवाश्यांची वाहतूक केली असून त्यांनी ७१ दशलक्ष मैल अंतर तोडले. प्रत्येक आठवड्याला पावदशलक्ष प्रवासी जम्बोने प्रवास करतात.

तांत्रिकदृष्टीने हे विमान खूपसे परिपूर्ण असल्याने इतर विमानांप्रमाणे तांत्रिक कारणाकरिता विमान उडायला उशीर झाला आहे असे विशेषे करून होत नाही. हे प्रमाण सध्यातरी जास्तीत जास्त १५ मिनिटे उशीर इतकेच आहे. यामुळे प्रवासी ठरलेल्या ठिकाणी वेळेवर पोहचणे सुलभ होऊ शकले आहे.

एअर-इंडियाचे पहिले ७४७ सम्राट अशोक येथे आल्यापासून जम्बोसाठी एवढा अवाढव्य खर्च केल्याबद्दल अनेकजण टीका करीत आहेत. पण स्पर्धेत टिकण्यासाठी तर हा खर्च आवश्यक होताच. शिवाय दुसऱ्याही काही गोष्टी लक्षात घेणे जरूर आहे. एअर-इंडिया फार मोठे परकीय चलन देशाला उपलब्ध करून देते, या विमानांचा खर्च कमी असून काम प्रचंड आहे. त्यामुळे ही पहिली गुंतवणूक जरी मोठी दिसली तरी ती वसूल होऊ शकते. एअर-इंडियाची इतर बोईंग ७०७ आता जुनाट होऊ लागली आहेत. ती बदलणे कालांतराने आवश्यक ठरेल. आणि लंडन व युरोप त्याचप्रमाणे पूर्वेकडे हाँगकाँग, जपान येथे एअर-इंडियानें जाणाऱ्या प्रवाशांचे प्रमाण प्रचंड आहे. लंडन–न्यूयॉर्क मार्गावर मात्र एअर-इंडियाला प्रवासी फार कमी मिळतात. तेव्हा युरोप व पूर्वेकडे जाणाऱ्या ह्या प्रवासी लोंढ्याची वाहतूक

करायला ७४७ योग्यच आहेत. पण तरीही असे म्हणता येईल की, ७४७ चे यश।पयश पुढील गोष्टींवर अवलंबून राहील. भारतात पर्यटकांना आकर्षण वाटेल अशा सोयी उपलब्ध करून देणे, म्हणजे चांगल्या हॉटेलसची सोय, पर्यटनासाठी लक्झुरिअस बसेस, निरनिराळया ठिकाणी पर्यटन स्थळांची माहिती देणारे प्रशिक्षित मार्गदर्शक आणि महत्त्वाचे म्हणजे येथे येणाऱ्या प्रवाशांची झटपट वाहतूक करण्याची इंडियन एअरलाईनची समर्थता. त्याचप्रमाणे विमानतळावर एवढ्या प्रवाश्यांना चटकन मोकळे करण्याची कस्टम्सनेही व्यवस्था करणे, तसेच 'पी' फॉर्मची डोकेदुखी काही प्रमाणात तरी कमी करणे वगैरे गोष्टी होणे आवश्यक आहे.

आपण पर्यटनाकडे अजून हवे तसे लक्ष दिलेलेच नाही. या दृष्टीने फारच थोड्या सोयी उपलब्ध आहेत मग येथे प्रवासी आकर्षित होणार तरी कसे. आपल्याकडे धड चांगल्या प्रतीच्या कागदावर अप्रतिमपणे छपाई केलेली पिक्चर पोस्टकार्डेही उपलब्ध नाहीत. सिलोनसारख्या छोट्या देशात प्रवास करताना त्यांनी पर्यटनाकडे किती आस्थेवाईकपणे लक्ष दिले आहे याचा मला अनुभव आला. आपल्यालाही हे करणे सहज शक्य आहे. या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहे.

असे झाले तर जम्बो चांगलीच किफायतशीर पडतील.

□ □ □

## ७०७ व ७४७ मधील तुलना

| | ७०७ | ७४७ |
|---|---|---|
| (१) पंखांची लांबी– | १४५ फूट ९ इंच | १९५ फूट ८ इंच |
| (२) संपूर्ण विमानाची लांबी– | १५२ फूट ११ इंच | २३१ फूट ४ इंच |
| (३) रुंदी– | ४२ फूट ६ इंच | ६३ फूट ५ इंच |
| (४) जास्तीत जास्त वेग– | ५६० मैल | ५८० मैल |
| (५) जास्तीत जास्त उंची गाठू शकते– | ४२,००० फूट | ४५,००० फूट |
| (६) इंधन– | १९,८६४ (इं. गॅ.) | ४२,४८१ (इं. गॅलन्स) |

नरेंद्र दाभोळकर

# रंगलेल्या शिरोडकर स्पर्धा

मुंबईचे नामवंत कबड्डी संघ ज्यावेळी एकमेकासमोर उभे ठाकतात त्यावेळी कोण कुणाचा पराभव करेल याचा अंदाज करताना भल्या भल्यांची मती गुंग होते. काही वेळा परगावचे संघही या चमत्कारात भाग घेतात. यंदा मुंबई सुवर्ण चषक स्पर्धा जिंकणारा स्टेट बँक. त्यानंतर कोणत्याही स्पर्धेत पुन्हा अजिंक्यपद पटकवू शकला नाही. कोणाच्याही ध्यानीमनी नसलेल्या बॉम्बे पोर्टस असोशिएशनच्या संघाने शिर्के कबड्डी स्पर्धेची अंतिम फेरी गाठली. शिरोडकर चषकाच्या स्पर्धेने यावर्षीचे सगळ्यात विस्मयजनक निकाल दिले. मी मी म्हणणाऱ्या संघांना आपल्या गटविभागातच नाइलाजाने आपला गाशा गुंडाळावा लागला.

एका गटातून अवघा एकच संघ वर घ्यावयाचा या तंत्राने सध्या साखळी सामन्यात भलत्याच दडपणाखाली खेळावे लागते. तसा खेळ करूनही पुन्हा काही चांगले मातब्बर विभागातच हकनाक बाद होतात. गेले तीन वर्षे राज्य चाचणी स्पर्धेत अंतिम फेरी गाजविणारा पुणे जिल्ह्याचा संघ ठाण्याकडून पराभूत होताच यंदा धुळ्याच्या निवड स्पर्धेत गटातच गारद झाला. खेळाडूंना अधिकाधिक संधी देण्यासाठी ज्या चाचणी स्पर्धा घ्यायच्या त्यामध्ये एका गटातून अवघा एकच संघ वर घेण्यात काय हेतू साधला जातो कुणास ठाऊक? इतरही ठिकाणी हा नियम अन्यायकारकच वाटतो. बरे महाराष्ट्रात तो सगळीकडे सारखाच लागू होत नाही. सांगली पुण्याला निराळी पद्धत. तेथे विभागातून दोन संघ वर घेतात. तर मुंबईकरांची निराळीच तऱ्हा.

ही गटातली कटछाट यंदाच्या शिरोडकर स्पर्धेत भलतीच रंगली. भल्याभल्या संघाच्या तोंडचे पार पाणी पळाले. बेस्टचा संघ हा सतत तीन वर्षे मुंबई ट्रॉफीची अंतिम फेरी गाठणारा आणि त्यापैकी दोनदा ती जिंकणारा बलाढ्य संघ. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर तो मात करेलच ही खात्री. सुरुवात अपेक्षेप्रमाणे झाली. श्रीपाद शिरोडकरची पकड करून बँकेने मिळवलेली आघाडी मधु पाटीलने एकाच चढाईत चार गडी बाद करून संपुष्टात आणली. पण बँकेच्या मारुती लोखंडेने भलताच दमदार खेळ केला. त्याने मध्यंतरापूर्वी परशुराम आणि मधु या पाटील द्वयाला टिपले आणि मध्यंतरानंतर एकाच चढाईत तीन गडी बाद करून बँकेच्या ७-१७ या धवधवीत विजयाचा मार्ग मोकळा केला. या स्पर्धेत प्रथम पदार्पण

करण्यात्या कल्याणच्या विम्कोने रेल्वेच्या नाकात दम आणला. सामना अगदी संपायला येईपर्यंत त्यांनी पाच-पाच अशी बरोबरी राखली. याच मैदानावर मागील वर्षी रेल्वेच्या संघाबरोबर राजस्थानच्या संघाने राष्ट्रीय सामन्यात रेल्वेला असेच झुंजविलेले मला आठवले. त्यावेळी शेवटच्या दोन मिनिटात सदा शेटे आपल्या संघाच्या मदतीला धावला होता. यावेळी मात्र विम्कोच्या दुर्दैवानेच रेल्वेला हात दिला. पंचानी नाईकला दमबाद केले आणि रेल्वेला एका गुणानी हा सामना जिंकणे शक्य झाले.

महाराष्ट्र राज्य सहकारी बँक यावेळी भलतीच फॉर्मात होती. आपल्या विभागात मध्य रेल्वेचीही त्यांनी धूळदाण उडवली. २८-७ अशा गुणांची नोंद फलकावर करून जगन्नाथ बलखाडेने पकडीचा डोळे सुखविणारा खेळ केला. वर्षांच्या विश्रांतीनंतर मध्यरक्षक म्हणून उतरलेल्या चंद्रकांत मांडरेनी त्याला चांगली साथ दिली—महिन्या-पूर्वीच बाबा शिर्के निधी स्पर्धेत अजिंक्यपदाची माळ मिरवणाऱ्या मध्य रेल्वेला विभागातच संपुष्टात यावे लागले.

ब गटात महिंद्र आणि महिंद्र व महाराष्ट्र बँक या दोन संघाचा समावेश होता. गेले दोन वर्षांत जे संघ महाराष्ट्रात एकदम चमकू लागले त्यापैकी हे दोन संघ. वसंत ढवण आणि जयवंत परब या सारख्या नामांकित खेळाडचा महिंद्रला आधार मिळाला. महाराष्ट्र बँकेने असेच क्षेत्ररक्षण आणि पहिला गुण निदान रेषेवर हमखास मिळवण्याचे कसब यांच्या साह्याने आपला जम बसविला, लक्ष्मण तिरवडकर हा त्याचा मध्यरक्षक आज महाराष्ट्रात कौतुकाचा विषय आहे. या दोन्ही संघांना वळऱ्याच्या नॅशनल मशिनरने अक्षरशः पाणी पाजले. २८–३ असा अपमानास्पद पराभव महेंद्रला पत्करावा लागला तर निदान रेषेवर पहिला गुण मिळवायाचे तंत्र फसल्यावर महाराष्ट्र बँकेला सामन्यावर पकड घेणे अवघड जाते हे पुन्हा एकदा सिद्ध झाले.

ड गटात नेव्हल डॉक यार्डने बंगलोरच्या हिंदुस्थान ट्रान्समिशन प्रॉडक्टसचा ५४–११ असा दणदणीत पराभव केला आणि स्टेट बँकेलाही असेच सरळ सरळ नामोहरम केले. वसंत सूद सारख्या चतुरस्त्र आणि बलदंड खेळाडूची अनुपस्थिती स्टेट बँकेच्या नावाजलेल्या संघाला चांगलीच जाणवली. यदाची भुईर ट्रॉफी जिंकणारा हा संघ विभागातच दोनदा पराभूत झाला. बंगलोरकरांना स्टेट बँक आघाडीवर असतानाही त्याचा पराभव करून क्रिडाशौकिनांना चांगलाच धक्का दिला. बंगलोरचा कर्णधार मारुती कुसपे याचा मात्र सिंहाचा वाटा होता. 'इ' गटात महाराष्ट्र बँक आणि केमिकल्स अंबरनाथ या दोन प्रमुख संघाचा समावेश होता. या दोन्ही संघांनी भिलाई पोलाद कारखान्यावर सहजपणे मात केली. मुंबईबाहेरच्या प्रथम दर्जाच्या संघात आज या दोन्ही संघाचा समावेश होतो. हा सामना बचावात्मक होईल ही अटकळ सुदैवाने खोटी ठरली. अंबरनाथच्या अरुण नाईकने पहिल्याच चढाईत तीन

गडी बाद करून सामना आपल्याकडे खेचून आणला आणि तो ११–६ अशा गुणांनी जिंकला. मग त्यांना सोपे गेले. या सामन्याबरोबर विभागीय विजेतेपदही त्यांनी खिशात घातले.

स्पर्धेच्या तिसऱ्या दिवशी 'फ' गटातील संघाची कमतरता भरून काढण्याला एअर इंडियाला स्थान द्यावे लागले. हा प्रकार बऱ्याच जणांना खटकला. समजा एखाद्या विभागात दोनच संघ असते म्हणून असे काय फार मोठे बिघडले असते, एअर इंडिया आणि यशवंत सोलापूर या दोन्ही संघाचा भारत इलेक्ट्रॉनिक्स बंगलोर या संघाने पराभव केला. यशवंत कारखाना ही सोलापूरकरांची खास फाईण्ड आहे. पूर्वी खेळाडूंच्या रजिस्ट्रेशनची पद्धत अस्तित्वात येईपर्यंत सोलापूरचा निवडक खेळाडूंचा सशक्त संघ सर्वांना पाणी पाजे. पुढे रजिस्ट्रेशनच्या नियमामुळे हे जमेना. पराभवाची मानहानी सोलापूरकरांना बोचू लागली. मग त्यांनी एक कंपनी काढली. ती कसले उत्पादन करते कोणास ठाऊक. पण त्यात सगळे चांगले खेळाडू नोकरीला ठेवले. सोलापूरच्या खाजगी संघातील सर्व चांगले खेळाडू आता सोलापूर महानगरपालिका आणि यशवंत कंपनीत सामावलेले आहेत. दुर्दैवाने हा संघ या सामन्यात यशवंत ठरू शकला नाही.

या सर्व गटाच्या पार्श्वभूमीवर आपल्या गटात अजिंक्यपद मिळवताना हिंद सायकल संघाने केलेला संयमित आणि आत्मविश्वासाचा खेळ साऱ्यांच्याच मनात भरला. त्यांनी सहजपणे आपल्या विभागाचे विजेतेपद मिळवले.

उपांत्यपूर्व फेरीतले दोन्हीही सामने तसे एकतर्फी झाले. नेव्हल डॉक यार्डला को-ऑपरेटिव्ह बँकेपुढे पाय रोवताच आले नाहीत. जाल कारभारी आणि विनायक मांडरेनी अष्टपैलू खेळ करून १८–८ असा सामना आपल्या संघाला जिंकून दिला. बंगलोरकरांनी आपल्या चौफेर चढाईने कळव्याचा पराभव केला.

या स्पर्धेत अपेक्षा उंचावणाऱ्या सहकारी बँकेच्या संघाला हिंद सायकलने उपांत्य फेरीत गोता दिला आणि अंतिम फेरी गाठली तर केमिकलसने बंगलोरचा पराभव करून अंतिम फेरीत पदार्पण केले.

मागील वर्षीचे अजिंक्यपद राखायचेच या जाणीवेने हिंद सायकलचा संघ अत्यंत सावधपणे खेळला. कपलीही घाई वा आक्रमकता त्यानी दाखविली नाही. टॉस हरल्यामुळे पहिला गुण मिळवणे केमिकलसला क्रमप्राप्तच होते. त्यानी निदान रेषा बंद हे आपले खास ठेवणीतले हत्यार काढले. पण बूमरँग प्रमाणे ते त्यांच्यावरच उलटले. धीर न खचू देता गेलेले गुण मिळवण्यासाठी केमिकलसच्या रामचंद्र बागवेनी तुफानी चढायांना सुरुवात केली. वीस फुटांवर जाऊन त्यांनी रत्नाकर शेट्टीला ज्या बेडरपणे बाद केले ते धाडस डोळे आणि मन सुखावणारे होते. दुर्दैवाने सामन्याचे पारडे फिरवण्याइतके यश त्याच्या चढाईला लाभू शकले नाही. प्रथमपासूनच सुव्यवस्थितपणे केलेल्या खेळामुळे अजिंक्यपद आपल्याकडे राखणे हिंद सायकलला शक्य झाले.

महिला कबड्डी खेळतात याचेच कौतुक आपण किती दिवस करणार याचा विचार आता एकदा केला पाहिजे. मुंबईमधल्या नवयुग क्रीडा, नवयुग मंडळ (एकाच मंडळाच्या वादातून निर्माण झालेले दोन संघ) आणि विश्वशांती आणि ठाण्याचा साधना व राणाप्रताप येवढे संघ सोडले की अखिल भारतीय कबड्डीस्पर्धेत सतत पंधरा वर्षे अजिक्यपद मिळवणाऱ्या महाराष्ट्र राज्याचा महिलांचा कबड्डी विभाग संपुष्टात येतो. बाकीचे संघ सामन्यात भाग घेतात पण त्यांचे अस्तित्व हे पावसाळी छत्रीप्रमाणे असते. पंधरा दिवस सराव करून आणि इकडच्या तिकडच्या चार मुली जमा करून कबड्डी खेळाडू संघ आणि खेळ यापैकी कशाचेच भले होत नाही. एखाद्या चांगल्या संघाशी या संघाची गाठ पडल्यावर होणारा खेळ अत्यंत एकतर्फी आणि बेचव असतो. साधना मंडळाने ठाण्याच्या मावळी मंडळाचा गुणांचे शतक नोंदवून धुव्वा उडविला हे महिलांच्या कबड्डीच्या वाढीच्या दृष्टिने मला काही फारसे आनंदाचे वाटत नाही.

कागदावर गतवर्षीच्या राणाप्रतापच्या विजेत्या संघाचा नवयुग मंडळाने जो पराभव केला त्यामध्ये मात्र अनपेक्षित चमकदार कबड्डी बघावयास मिळाली. सरोजनी पाटकर व शीला पाटील यावेळी उत्कृष्ट खेळल्या.

अंतिम सामना जिंकण्याचे नवयुग क्रीडा मंडळाचे काम यामुळे सोपे झाले. खरे म्हटले तर नवयुग क्रीडा मंडळाशी बरोबरी करू शकणारा एकही महिला संघ सध्या मला महाराष्ट्रात आढळत नाही. अत्यंत चुरशीचा सामना होऊन एखाद्या वेळेस हा संघ पराभूत होतही असेल. जसे यंदाच्या भुईर सुवर्णचषकाच्या सामन्यात विश्वशांतीकडून त्यांना हार खावी लागली. पण सगळ्याचा सर्व बाजूने विचार केला तर हा संघ आजतरी महाराष्ट्रात सर्वश्रेष्ठ वाटतो. चित्रा आणि क्रांती या नाबर भगिनी आकर्षक आणि तडफदार चढाईबहाद्दर असल्यामुळे या संघाचे काम नेहमीच सोपे होते. याही सामन्यात त्यांनी आपल्या संघाला सहजपणे आघाडी मिळवून दिली. त्यानंतर वत्सला ढुमणेने एकाच चढाईत चार गडी बाद केल्याने थोडी रंगत येईल असे वाटले होते, पण शेवटी ही लढत एकतर्फीच ठरली.

मुंबईतले आणि महाराष्ट्रातले सर्व नामवंत संघ भुईर सुवर्णचषक आणि तिरोडकर चषक या दोन्ही सामन्यातच एकत्रित दिसतात. यंदा पुण्याची पी. एम. टी., सोलापूरची महानगरपालिका, सांगली पोलीस अशा काही संघांची अनुपस्थिती या सामन्यात जाणवली. नऊ तारखेपासून साताराला चालू झालेल्या श्री शिवाजी उदय मंडळाच्या रौप्यमहोत्सवी सामन्यात हे सर्व संघ पुन्हा एकदा आमने-सामने येण्याचा अनोखा योग घडला आहे. मुंबईबाहेर महाराष्ट्रातले सर्व नामवंत संघ एके ठिकाणी येण्याचे हे पहिलेच उदाहरण! पाहू या कबड्डीमधली अनिश्चितता तेथे काय चमत्कार दाखवते ते. □□

# चेतना

चांगला ?
होपलेस ?
सेक्सी ?
बोअर ?

चेतना चांगला आहे. चेतना होपलेस आहे. चेतना सेक्सी आहे. चेतना वेगळा आहे. चेतना कंटाळवाणा आहे. एक ना अनेक प्रकारच्या प्रतिक्रिया या चित्रपटाबाबत नोंदवल्या जात आहेत आणि चित्रपटाबाबत होत असलेली ही चर्चा कदाचित चित्रपटाची लोकप्रियता वाढवून निर्मात्याच्या पदरामध्ये आर्थिक यश घालून जाईल.

रेहना सुलतान, अनिल धवन, हे फिल्म इन्स्टिटयूटच्या अभिनय विभागातून बाहेर पडलेले नवीन चेहरे घेऊन सकलक आय्. एम्. कन्नु यांनी नितीन फिल्म्स् या आपल्या संस्थेमार्फत हा चित्रपट तयार केला आहे. कथाकल्पना बी. आर. इशारा यांची असून दिग्दर्शनही त्यांचेच आहे. मोठमोठ्या शहरातून खाजगी स्वरूपात मोठ्या प्रमाणावर वेश्या व्यवसाय चालतो. अशा स्वरूपाचा व्यवसाय करणाऱ्या सीमा नावाच्या तरुणी भोवती या चित्रपटाचे कथानक गुंफण्यात आले आहे. दिवसा अगदी वेगळ्या प्रकारचे आयुष्य जगणाऱ्या सीमाचे रात्रीचे जग अगदी वेगळे असते. दिवसा तिचे निरीक्षण करणाऱ्या कोणासही ही मुलगी रात्री असा काही व्यवसाय करत असेल, हे सांगूनही खरे वाटणार नाही. अशा या मुलीच्या आयुष्यात एक कोवळा तरुण तिच्या मनाविरुद्ध येतो. प्रथम दर्शनीच तिच्या प्रेमात पडतो आणि योगायोगाने त्याची आणि तिची नेमकी नको त्या ठिकाणी, नको त्या वेळी गाठ पडते. सीमाचे खरे स्वरूप लक्षात आल्यावर अनीलला धक्का बसतो. या स्वरूपामुळेही तिच्या संबंधीच्या आपल्या भावनांना तो वेगळे स्वरूप देऊ शकत नाही. सीमाला तो चक्क लग्नाची मागणी घालतो. या अनपेक्षित मागणीने सीमाही चक्रावून जाते. आपल्या धंद्यात आयुष्य घालवलेल्या एका स्त्रीचा सल्ला घेऊन ती अखेर अनिलबरोबर नवीन आयुष्य सुरू करण्याचा निर्णय घेते.

नवीन सुखकर आयुष्याबरोबर खऱ्या अर्थाने समरस होणे सोपे नसते. हा बदल हळुवारपणे व्हावा अशी अपेक्षा ती व्यक्त करते. अनिल तिच्यापासून दूर रहाण्याचे आश्वासन देऊन तिला प्रतिसाद देतो. दोघांमधील अंतर कमी होत जाते. जवळीक



रेहना सुलतान । अनिल धवन

निर्माण होते. सीमा मिलनातून प्रेयसीच्या भावना अनुभवू लागते. अनिलशी एकरूप होण्याची इच्छा व्यक्त करते आणि अचानक अनिलला काही कामासाठी बाहेर गावी जावे लागते. तो बाहेरगावी असताना सीमाची तब्बेत बिघडते. डॉक्टर येतात, अभिनंदन करून गोड बातमी सांगतात आणि सीमाला असह्य धक्का बसतो. आपल्या पोटात कोणाचे तरी बेवारशी पाप वाढते आहे या जाणिवेने ती अस्वस्थ होते. तिच्या सर्व स्वप्नांचा चुराडा होतो. अनिलने आपल्याला याही अवस्थेत जवळ केले, तरी ते फक्त दयेच्या भावनेने, असे समजून ती आत्महत्या करते.

इशारा यांचे या पूर्वी अनेक चित्रपट आले असले तरी त्यांच्या आतापर्यंतच्या चित्रपटांपैकी सर्वोत्कृष्ट म्हणून या चित्रपटाचा उल्लेख करावा लागेल. त्यांचा हा चित्रपट अनेक दृष्टीने लक्षात राहण्यासारखा आहे. वेगळे कथानक, धाडसी मांडणी, नवीन कलावंत व तंत्रज्ञ यांना दिलेली संधी, अशा अनेक कारणांमुळे चित्रपट वेगळा वाटतो. अर्थात हे वेगळेपण चांगलेच आहे असे नाही. चित्रपटाचा प्रारंभ आणि अखेरचा भाग अगदी सामान्य आणि नेहमीच्या हिन्दी चित्रपटांप्रमाणे वाटतो.

इशारा यांच्या लेखणीतून उतरलेले संवाद प्रसंगी अतिशय टोकदार, तर प्रसंगी अतिशय नाजुक आहेत. संवाद लेखनातील वेगळेपणही नजरेत भरते. कथेशी प्रामाणिक राहून चित्रपट करायचा असल्यास या स्वरूपाच्या कथानकाचे चित्रीकरण हा एक गुंतागुंतीचा भाग होऊन बसतो. चित्रीकरण करताना काही शॉटस् घेतले तरी सेन्सॉरच्या कात्रीचा बागुलबुवा सतत असतो. चित्रीकरणातील या अडचणीवर पुष्कळशा प्रमाणात मात करण्यात आली असून, सेन्सॉरचे धोरणही या चित्रपटाबाबत पुष्कळसे लिबरल वाटते. कथानकाचे स्वरूप लक्षात घेऊन सेन्सॉरने दिलेल्या या सवलतीचे स्वागत केले पाहिजे. चित्रपटाच्या पूर्वार्धावर इशारा यांची जेवढी पकड आहे, तेवढी उत्तरार्धावर नाही. अर्थात या पहिल्या भागातही सीमाने

देवळात-मशिदीमध्ये, चर्चमध्ये जाणे यासारखा चमत्कारीक भाग आहेच. उत्तरार्धामध्ये सीमाला ज्यावेळी येणाऱ्या मातृत्वाची कल्पना येते, त्यावेळी ही वार्ता देणाऱ्या डॉक्टरांनाच ती मला यातून मुक्त करा अशी विनंती करते. समजा त्या डॉक्टरने नाकारले तरी अन्य मार्गाने मोकळीक करून घेणे तिला शक्य होते. किंबहुना हे मातृत्व मुळातूनच टाळणेही शक्य होते. म्हणजेच व्यावहारीक पातळीवरून पाहता ज्या परिस्थितीत सीमा आत्महत्या करते ती परिस्थिती वास्तव वाटत नाही. म्हणून हा सर्व प्रकार भावनात्मक पातळीवर पाहावा लागतो आणि चित्रपटाचा शेवट सर्वसाधारण हिंदी सिनेमा सारखाच ठरतो.

त्याउलट प्रेक्षकांना कधीच न दिसणाऱ्या बापाशी सीमाचे चाललेले हितगुज व स्तव भावस्पर्शी वाटते. सीमा या असल्या व्यवसायाकडे का वळते, याचे जे कारण फ्लॅश-बॅकमध्ये दाखवले आहे ते तांत्रिकदृष्टचा परिणामकारक आहे, परंतु टिपीकल फिल्मी आहे.

फिल्म इन्स्टिटयुटच्या कमेरा डिपार्टमेंटमधून यशस्वीरित्या बाहेर पडलेले सुदर्शन नाग यांचे हे पहिलेच चित्र त्यांच्या कौशल्याची चुणूक दाखवून जाते. त्यांनी योजलेले अँगल्स, लाइटिंग, कथाविषयाचा अभ्यास करून योजल्याचे जाणवते. रेहना सुलतान आणि अनिल धवन या जोडीचेही मनापासून स्वागत. विशेषतः रेहना ज्या पद्धतीने सीमाची अवघड व्यक्तिरेखा साकार करते त्या वरून या ट्रेंड तरुणीला निश्चितपणे भवितव्य आहे असे वाटते. काही खराब अँगल्स मात्र टाळणे आवश्यक आहे. शत्रुघ्न सिन्हा या ट्रेंड कलाकाराने यापूर्वीच मान्यता मिळवली आहे. व्यवसायिक यश त्याच्या बाबतीत निश्चित आहे.

आपल्या बहुसंख्य प्रेक्षकांना मात्र असे हे आगळे वेगळे 'चेतना' एक धक्काच ठरेल. □

# धरतीची लेकरे

## सुंदर छायाचित्रण । दुर्गा खोटे यांची प्रभावी भूमिका

सर्वसाधारण मराठी चित्रपटामध्ये आढळणार नाही, असे सुंदर छायाचित्रण आणि विषयांशी सुसंगत बाह्यचित्रण दृश्ये यामुळे सहकारी चित्रपट संस्थेने तयार केलेला धरतीची लेकरे हा चित्रपट वेधक झाला आहे.

र. वा. दिघे यांची पड रे पाण्या, ही कादंबरी या चित्रपटाद्वारे पडद्यावर आणण्यात आली आहे. चित्रपटाच्या सोयीच्या दृष्टीने काही बदल करण्यात आले

आहेत, मात्र असे बदल करूनही चित्रपट परिणामकारक वाटत नाही. दिशाहीन कथानक आणि संथ गती याचा चित्रपटावर प्रतिकूल परिणाम झाला आहे. कथा-प्रवाहही दोषास्पद आहे. असे दोष अनेक असले तरी जमेची बाजूही बळकट असल्याने एकत्रित परिणामाचे दृष्टीने चित्रपट टाकाऊ वाटत नाही. निलकंठ मकदूम यांनी चित्रपटावर परिश्रम घेतले आहेत. छायालेखक व्ही. बारगीर आणि दिग्दर्शक निलकंठ मकदूम या जोडीची कामगिरी कौतुकास्पद आहे. विषयाशी सुसंगत ठरतील अशी बाह्यचित्रण स्थळे निवडून आणि त्याचा सुयोग्य उपयोग करून या जोडीने विषयाशी सुसंगत असे वातावरण छान उभे केले आहे.

संतूची सत्वशील, भोळ्याभाबड्या माणसाची व्यक्तिरेखा चंद्रकांत या जुन्या-जाणत्या नटाने भूमिका समजून घेऊन साकार केली आहे. निळू फुले इरसाल पाटलाच्या भूमिकेत रंगत आणतात. पी. डी. ए. च्या एक गुणी कलावंत सौ. सेवा चव्हाण, यांनी विशेष वाव नसतानाही विधवा–मोगलची भूमिका जिद्दीने साकार केली आहे. त्यांच्या मिस्टरांनीही त्याच नात्याने हजेरी लावली आहे. मीना सुखटनकर ही रंगभूमीवरील यशस्वी कलावंत पुरेसा वाव नसल्याने प्रभाव पाडू शकली नाही. संतूच्या मुलाची पैलवान अमृताची भूमिका करणारा कलावंत भालजींच्या तांबडी मातीमधील शक्तीकुमारपेक्षा बरा वाटतो इतकेच. कलाकारांमध्ये सर्वांत जास्त वाव आहे कोयनामाईची भूमिका करणाऱ्या दुर्गा खोटे यांना. पुष्कळ दिवसांनी मराठी चित्रपटामध्ये त्यांना मोठी भूमिका मिळाली आहे. या संधीचा त्यांनी भरपूर फायदाही उठवला आहे. संपूर्ण चित्रपटावर त्यांचा प्रभाव आहे. या उलट उमा पडद्यावर बराच वेळ दिसते, पण तिच्या कामाचे स्वरूपच असे आहे की, मनापासून काम करूनही तिचा प्रभाव पडू शकत नाही.

ग्रामीण मराठी चित्रपटामध्ये आढळणारी अन्य अनेक वैशिष्टचे–उदा. दादागिरी करणारा पाटील, तमाशात नाचणारी बाई, बाईभोवती गुंफलेले रहस्य, इत्यादी. मात्र असे असूनही एखादी गोष्ट मुद्दाम लादली आहे, किंवा वळेच लांबवली आहे असे आढळत नाही. चित्रपटाचा तोल सांभाळण्यात गती मंदावली आहे. ही मंदावलेली गती काही वेळा त्रासदायक ठरते. परंतु अवास्तव वाटत नाही. व्यंकटेश माडगूळकर यांचे संवाद ग्रामीण भागातील बोली भाषेशी जवळीक करणारे असल्याने परिणामकारक वाटतात. व्यक्तिरेखेच्या तोंडी शोभणार नाही अशी बोजड भाषा वापरण्याचे टाळून त्यांनी लिहिलेले संवाद चित्रपटाची रंगत वाढवतात.

संगीत हे या चित्रपटाचे अजून एक आकर्षण. ग. दि. माडगूळकर यांच्या अर्थवाही गीतांना दत्ता डावजेकर यांनी उत्तम चाली दिल्या आहेत. सर्व गीते श्रवणीय असून त्यांचे चित्रीकरणही चांगल्या पद्धतीने करण्यात आले आहे. अपवाद फक्त 'मरे बन की'च्या चालीवरील ओढो–बैलदान या गीताचा. करमुक्त दराच्या लाटेवर आरूढ होऊन दाखल झाल्यावरही चित्रपटाला पुरेसा लोकाश्रय मिळू नये, ही खेदाची बाब वाटते.

□ □ □

# अंदाज

पंडित वि. म. जोशी
ज्योतिष विशारद

२२ ते २८ मे १९७१

**मेष** : शरीरप्रकृती साधारण नरमच राहील. धनस्थानची स्थिती चांगली राहील. वाचेत थोडा कठोरपणा यईल. जपून बोलावे. प्रवास योग येईल. बौद्धिक कामाकरता प्रवास करावा लागल घरात काहीतरी धार्मिक समारंभ होईल. घरात सुखसमाधान राहील. भागिदार, पत्नी वगैरे चांगल्या वागतील. सर्व प्रकारची मदत वडील भावंडांकडून होईल.

विद्याभ्यासात यश यईल. शास्त्रीय अभ्यासाकरता सरकारी अनदान मिळण्याचा योग आहे. सरकारी नोकरीत असणाऱ्या मुलांना प्रमोशन मिळेल. घरात कोणीतरी जास्त आजारी होण्याचा योग आहे. भाग्येश, दशमेष एकादशेष गुरु-शनी यांचा शुभयोग आहे. ३६ ते ४२ वयाच्या व्यक्तींना अमाप पैसा मिळेल. फॅन्सी वस्तूंचा व कापडाचा व्यापार करणारांना दिवस प्रगतीपर आहेत. शुभ तारखा २२।२३।२६।२७.

**वृषभ** : शरीरप्रकृती चांगली राहणार नाही. मूत्र विकाराचा त्रास होईल. धनस्थिती अडचणीची होईल. येणे वेळवर येणार नाही. स्वभावात अत्यंत हट्टीपणा येईल धार्मिक कामाकरता प्रवासयोग यईल. घरासंबंधी प्रश्न चांगल्या रीतीने सुटेल. त्यातून भाग्य उदयाला येईल व मानमान्यता वाढेल. सर्व नातलग एकत्र येतील व दिवस सुखासमाधानात जातील.

विद्येत सर्वप्रकारची माघार घ्यावी लागेल. शास्त्रीय संशोधन करणारांना महिना प्रगती होऊ न देणारा आहे. संततीची प्रगती रोखली जाईल. भागीदारांकडून थोडासा विरोध केला जाईल. ४२ च्या पुढील व्यक्तींना हा अनुभव जास्त येईल. सरकारी प्रश्न जरा अवघड होतील. लोखंडी सामानाचे व्यापारी, सहकारी शेतकी करणारे शेतकरी यांना खूपच चांगले दिवस जातील. धंदा चांगलाच चालेल. शुभ तारखा २२।२३।२६।२७।२८

**मिथुन** : शरीरप्रकृती व गृहस्वास्थ्य चांगले राहील. धार्मिक कामाकरता पैसा जमा करण्याला दिवस चांगले आहेत. जीर्णोद्धाराकरता मदत थोड्या श्रमात मिळेल फौजदारीच्या खटल्याकरता प्रवास करावा लागेल. त्यात मनासारखा निकाल लागेल. बौद्धिक व्यवसाय करणारांना दिवस चांगले जातील. थोडासा आतड्याचा विकार होण्याचा योग आहे. शत्रूचा नाश होईल.

संततीचा उत्कर्ष होईल. विद्याभ्यासात यश प्राप्त होईल. चित्रकला, वैद्यक, गायन कला, फॅन्सी वस्तू तयार करणारे या सर्वांना दिवस खूपच प्रगतीपथावर नेणारे आहेत. भागीदार व पत्नी थोडेसे अडवणूकीची वागणूक करतील. वडील-बहिणीचे यजमान बरेच आजारी होण्याचा योग आहे. प्रेमाच्या प्रकरणात सापड-ण्याचा योग आहे. २८ च्या पुढील व्यक्तींना हा योग आहे शुभ तारखा २२।२३।२६।२६।२८.

**कर्क :** शरीरप्रकृती जराशी त्रासदायकच राहील. आध्यात्मिक विचारांनी मन-स्ताप होईल. धनस्थानाची स्थिती चांगलीच सुधारेल. अष्टमेश, भाग्येश व धनेश शनी-रवी यांची लाभस्थानात युती आहे व त्यावर पंचमातून धनाचा कारक गुरु पाहतो. अचानक धनलाभ होईल. सरकारी अधिकाऱ्यांना अमाप पैसा मिळेल. प्रवासात लाभ होईल.

विद्याभ्यासात थोडे अपयश येईल. इंजिनीअरींग, मेडिकल कोर्स करणारांची फार कुचबणा होईल. पत्नी, भागिदार व वडील भावंडे नीट वागणार नाहीत. उद्योगधंदा चांगलाच चालेल. दशमातील शुक्र, बुध मानमान्यता वाढवतील. हा योग सोमवारी येईल. ३२ च्या पुढील व्यक्तींना हा योग जास्त येईल भाग्योदय कारक घटना घडतील. गुरूंना प्रेमविवाहाचा योग आहे. शुभ तारखा २२।२३। २५।२६।२७।२८

**सिंह :** शरीरप्रकृती फारच चांगली राहील. शनी-रवींची दशमात युती होत आहे. ती प्रकृतीला फार चांगली. लग्नेश दशमात व सहाव्या व सातव्या घरांचा स्वामी दशमात गुरू दृष्ट. शत्रूकडून, भागिदारांकडून मान मान्यता वाढविण्याला


## अक्षरपद्धती, कुटुंबनियोजन आणि कुटुंबसुयोजन

अनैतिक साधने न वापरता मनोवांच्छित संतति होईल. सुयोजनाकरता पाळावयाचे दिवस, महिने, चंद्र वगैरेंचा तक्ता उपयोगाच्या माहितीसह रु १०१/– व नियोजनाचा तक्ता रु.५१/– शिवाय त्यावर Astro-Medical उपाय सांगू. याशिवाय वर्षफल रु १०/– विवाह प्रश्न रु. १०/– व इतर सर्व कामे केली जातील. भेटण्याची वेळ सकाळी ८ ते ११

**प. वि. म. जोशी,** ज्योतिष विशारद

" गीताप्रसाद " आऊट हाउस, कर्वे रोड, पुणे नं. ४

मदत होईल. केंद्रातील गुरू सुखाची वृद्धी करील. घरात आनंदी आनंद राहील. हा योग सोमवारी येईल. अमावास्या चांगली जाईल.

— विद्याभ्यासात संपूर्ण यश. अचानक धनलाभ होईल. धनस्थिती फारच चांगली राहील. भाग्य व दशमातील पंचग्रही सर्व बाबतीत यशप्राप्ती करून देईल. बुद्धी सामर्थ्यावर भाग्योदय होईल. संततीचा उत्कर्ष होईल. सरकारी अधिकाऱ्यांना विशेषतः पोलिस अधिकारी, न्यायखात्यातील उच्च श्रेणीच्या नोकरांना कामाचा बोजा वाढेल. सर्व सप्ताह शुभ फलदायी आहे.

**कन्या :** शरीर प्रकृती बिघडेल. बौद्धिक कामाचा ताण जास्त पडेल. भाग्योदयात अनेक अडचणी येतील प्रवास योग येईल. तो टाळावा. प्रवासात महत्त्वाच्या वस्तू गहाळ होण्याचा योग आहे. घरात अस्वस्थता निर्माण होईल. फौजदारी खटल्यांत भाग घ्यावा लागेल. पैशाची आवक चांगली राहील. मित्रांकडून फसवणूक होण्याचा योग आहे.

विद्याभ्यासात अपेक्षेपेक्षा कमी यश मिळेल. सरकारकडून सर्व तऱ्हेची मदत होईल. आत्मघातकी विचार निर्माण होतील. ४२ च्या पुढील व्यक्तींना हा अनुभव फार येईल. संतती नीट वागणार नाही. स्त्री संततीकडून अनपेक्षीत अडचणी निर्माण केल्या जातील. उद्योग धंदा फारच बसेल बौद्धिक व्यवसाय करणारांना फारच त्रास होईल. शुभ तारखा २४।२५।२६।२७।२८.

**तूळ :** शरीरप्रकृती चांगली राहील. पैसा अचानक भरपूर मिळेल. घराकरता विशेषकरून पत्नीच्या माहेरावडील व्यक्तींकरता बराच खर्च होईल. पराक्रम हातून घडेल. धार्मिक विचार मनात प्रबळ होतील. मातुल घराण्याकडून अनपेक्षित द्रव्याची मदत जरूरीच्या वेळी होईल. मित्रांकडून कामात अडथळे उत्पन्न होण्याचा संभव आहे

विद्येत माघार घ्यावी लागेल. सरकारी अनुदान मिळण्याच्या बाबतीत अडथळे निर्माण होतील. भागीदार जरा वाईट वागतील. कापडाचा धंदा करणारांना हा अनुभव जास्त प्रमाणात येईल. ३२ च्या पुढील व्यक्तिंना लेखन व्यवसायात प्रतीकूल दिवस आहेत. सार्वजनीक कामात यश मिळणार नाही. शुभ तारखा २२।२३।२५।२६।२७.

**वृश्चिक :** शरीरप्रकृतीला प्रवासात अपघात होण्याचा संभव आहे. सासरी राहावयाला जाण्याचा योग येईल. धनस्थानची स्थिती अत्यंत समाधानकारक राहील. सरकारी नोकरीत असलेल्या संततीकडून स्थावर इस्टेट घेण्याकरता रक्कम मिळेल. वडील भावंडांशी मतभेद होण्याचा योग आहे.

विद्येत नेत्रदीपक प्रगती होईल उच्च परीक्षाकरता प्रबंध दाखल करण्याला दिवस चांगले आहेत. सरकारी मान्यता मिळेल. या राशीची माणसे अत्यंत महत्वाकांक्षी असतात. नेहमी प्रगत होण्याची तीव्र इच्छा असते ती आता पूर्ण होईल

२८ ते ३२ वयातील व्यक्तींना हा अनुभव येईल. सार्वजनीक कामात अपयश येईल. शुभ तारखा २२।२३।२६।२७.

धन : शरीरप्रकृती नरम होईल. पचनाचा विकार वाढेल. व्ययातील गुरू मुखस्थानावर पाहातो त्यामुळे घरात सुख सौख्य नांदेल. धनेश शनी षष्ठांत आहे. त्यावर कारक गुरू पाहातो त्यामुळे धनलाभ चांगला होईल. खर्चानी हैराण होण्याची वेळ येईल. प्रवासात त्रास होईल. वाणीत फारच कठोरपणा येईल. बोलण्यावर संयम पाळावा बौद्धिक व्यवसाय करणारे व कलाकारांना दिवस चांगले आहेत.

विद्याभ्यासांत जरासे अपयश येईल. सरकारी मदत मिळणाऱ्या विद्यार्थ्यांना

---


फर्ज व जिगरी दोस्त चे निर्माते सहर्ष सादर करीत आहेत

**एक नवीन आगळी व चिरस्मरणीय प्रेमकथा**

विजयलक्ष्मी पिक्चर्स (प्रा.) चा

# प्यार की कहानी

| निर्माता | छाया : दिग्दर्शक | संगीत | संवाद | गीते |
|---|---|---|---|---|
| सुन्दरलाल नाहटा–ढुन्डो | रवि नगाईच | आर. डी. बर्मन | विश्वामित्र आदिल | आनंद बक्षी |

भू. तनुजा, अमिताभ बच्चन, फरिदा जलाल, अनिल धवन, प्रेम चोप्रा

**नॉव्हेल्टी ▪ कॅपिटॉल ▪ लोटस ▪ जयहिंद**

रोज सकाळी ११ वा. | २॥, ६, ९। | ११।, २॥, ५॥।, | ८, ११।, २॥,

शुक्र.शनि.रवि. ११॥ वा. | ९ | ५॥।, ९

**सूर्य** ११॥, २॥, ६, ९। — **श्री** (माटुंगा) ११।, २॥, ५॥।, ९ — **डीफेन्स** (कुलाबा) — **नंदी** (वांद्रे)

**मिलन** (सांताक्रूझ) **अंबर–संगम** (अंधेरी)

हंजर (जोगेश्वरी), टोपीवाला (गोरेगाव), संगीता (मालाड), जया (बोरिवली) नटराज (चेंबूर), आकाश (कुर्ला), श्रेयस (घाटकोपर), कृष्ण (भांडूप), अशोक (ठाणे), कृष्ण (कल्याण), सपना–प्रभात (उल्हासनगर).

– राजश्री वितरण –

अनेक अडचणी उत्पन्न होतील. पत्नी फार चांगली वागेल. भाग्योदय होईल. गुरु-रवी प्रती योग शत्रूनाश करील. उद्योग धंदा चांगला चालेल. वडील भावंडे व मित्रांकडून सपूर्ण सहाकार्य मिळेल. बुधवार गुरुवार फार चांगले जातील. संततीकरता पैसा खर्च करावा लागेल. शुभ तारखा २२।२३।२६।२७।२८.

**मकर :** शरीरप्रकृती चांगली राहील. गृह कलहामुळे मनस्ताप अतिशय होईल. वाणीत कठोरपणा येईल. तो टाळावा. प्रवास योग येईल त्यात फायदेशीर घटना घडतील शनीस्वगृहावर धनस्थानावर पाहतो आहे. सरकारी नोकराना वाम मार्गांनी भरपूर धन लाभ होईल. भावडे व मित्र चांगले वागतील. घरात काही तरी धार्मिक शुभ कार्ये होईल. हा योग शनिवार-रविवारी येईल.

विद्याभ्यासात यश येईल. पंचमेश दशमेश चतुर्थात आहे व पंचमावर गोचरी गुरु पाहतो हा योग चांगला आहे. अॅग्रीकलचर, सायन्स शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रगती पथावर नेणारे दिवस आहेत. चित्रकलेचा, गाण्याचा, फॅन्सी कपड्यांचा धंदा करणारा व्यवसायात अमाप पैसा मिळेल. फौजदारी खटल्यात यश प्राप्ती होईल. सार्वजनीक कामात यश येईल. शुभतारखा संबंध सप्ताह शुभ आहे.

**कुंभ :** शरीरप्रकृती चांगलेच राहील परनोरह घरात आनंदात दिवस जातील. धनस्थानाची स्थिती फारच चांगली राहील. भागीदारीच्या धंद्यात नफा खूप होईल पण वाढत्या उद्योगाला पैसा अपुरा पडेल. भरपुर भांडवलाची व्यवस्था १५ जुलैनंतर होईल भावंडांकडून व मित्रांकडून सर्व कामात मदत होईल.

विद्याभ्यासात नेत्रदीपक प्रगती होईल. ज्योतिष शास्त्र, चित्रकला, साहित्य प्रकाशन वगैरे धंदे करणाराना फार प्रगतीकारक दिवस आहेत. संततीचा उत्कर्ष होईल. स्वतःचे घर होईल. सरकारच सहकार्य मिळेल. नवमस्थानाचा अधिपति तिसऱ्या स्थानात स्वगृहावर पाहणारा आहे, तो भाग्योदय करील. २७ ते ३२ व्यक्तीना हा अनुभव जास्त येईल. शुभतारखा २२।२३।२६।२७।२८.

**मीन :** शरीरप्रकृती चांगलीच राहील. धनस्थानाला जरासा तडा जाईल. अनेक खर्चांनी बेजार होण्याचा योग आहे. भावंडांशी पटणार. प्रवासात नुकसानीचा योग आहे. घरात पाहुणे मंडळी येऊन दिवस आनंदात जातील. बुधवार गुरुवार हा योग येईल. २३ ते ३६ वयातील व्यक्तींना दिवस प्रगतीकारक आहेत.

विद्याभ्यासात भरघोस यशप्राप्ती होईल. तत्वज्ञानाचा अभ्यास करणारांची प्रगति होईल. संततीचा भाग्योदय होईल. हा योग शुक्रवारी जास्त येईल. वडील भावंडांशी जमणार नाही बौद्धिक व्यवसाय करणाराना प्रगतीपर दिवस जातील. संततीकरता खर्च करावा लागेल. उद्योगधंदा नीट चालेल. शुभतारखा २२।२३।२६।२७।२८

रशियन राज्यक्रांतीविषयी प्रचारात्मक साहित्य विपुल आहे. उजेडात आलेल्या नवीन माहितीच्या आधारे लिहिलेला मराठीतील हा मात्र एकमेव ग्रंथ आहे.

# व्होल्गा जेव्हा लाल होते

वि. स. वाळिंबे

अठरा रुपये

राजहंस प्रकाशन

पुणे

 पृष्ठ ६ वरून

नागपूरला धोटेच' व दिल्लीत जनसंघाचा विजय म्हणजे 'इंदिरा हवा' आता उरली नाही असे समजून विरोधकांनी पुढच्या निवडणुकीसाठी शिस्तबद्ध प्रयत्न करायला हरकत नाही, किंवा तसे करायलाच हवे एवढे मात्र खरे। ◻

# बंगला देश : राजनैतिक हालचाली

मुजिबूर-अल् रहमान यांनी बंगला देशचे स्वातंत्र्य जाहीर केल्याला दीड महिन्यावर अवधी लोटली तरी अजून खऱ्या अर्थाने पूर्व बंगाल स्वतंत्र नाही. मुक्ती सेनेच्या हालचाली थंडावल्या आहेत. पावसाळा सुरू झाल्यापासून समोरासमोर युद्ध करणे पाकिस्तानला जड जात आहे. मुक्ती सेना याचीच वाट पाहत होती. कारण तुटपुंज्या शस्त्रास्त्रांच्या सहाय्याने त्यांना गनिमी काव्याने लढता येणार होते.

पूर्व बंगाल पाकिस्तानातून अलग पडल्यास भारत-पाकिस्तान तेढ अधिक वाढणार आहे याची कल्पना सर्वांना होती. त्यामुळे तिकडे मुक्ती सेनेच्या हालचाली थंडावल्या तरी भारत-पाकमधील राजनैतिक पत्रापत्री वाढलेली दिसते याचे आश्चर्य वाटायला नको. विशेषतः ढाक्का व कलकत्त्यातील हायकमिशनच्या अधिकाऱ्यांना आपापल्या देशात सुरक्षितपणे पाठविण्याबाबतचा प्रश्न तर दिवसेंदिवस चिघळत चालला. रशियासारखे वजनदार राष्ट्र मध्यस्थी करू पहात आहे, पण पाकिस्तानच्या आडमठ्या धोरणाला तोडच उरली नाही.

कलकत्त्यात पाकिस्तानी हायकमिशनच्या अधिकाऱ्यांनी आपण बंगला देशाचे प्रतिनिधित्व करणार असल्याचे जाहीर करून हायकमिशनची कचेरी व मालमत्ता ताब्यात घेतली तेव्हापासून याह्याखान सरकार पेचात सापडले आहे. दिल्ली म्हणते, तो तुमचा आपसातील मामला आहे, आम्ही त्यात कशाला लक्ष घाला ?

दिल्लीत पाक हायकमिशनचे अधिकारीही गोंधळात पडले आहेत. आता बंगला देशचे प्रतिनिधी असलेले हुसन अली व त्यांच्या जागी कलकत्त्यात पाकचे डेप्युटी हायकमिशनर म्हणून आलेले मेहरी ममूद यांच्यात समोरासमोर बोलणी व्हावी व अली यांच्या सह हायकमिशनच्या सत्तर नोकर वर्गाच्या तोंडून त्यांच्या राष्ट्रनिष्ठेबद्दल ऐकायला मिळावे अशी इस्लामाबादची मागणी आहे. पण अशी 'भेट' करून देण्यास भारताला भाग पाडणे याह्याखान सरकारला शक्य नाही याची जाणीव दिल्लीतील त्यांच्या प्रतिनिधींना आहे. कारण एखाद्या व्यक्तीने

आपली निष्ठा दुसऱ्या राष्ट्राकडे जाहीर केल्यानंतर त्या व्यक्तीला जबरदस्तीने पहिल्या राष्ट्राच्या अधिकाऱ्यासमोर हजर करणे भारतीय-किंवा कोणत्याही देशाच्या कायद्यात बसत नाही. शिवाय तसा कायदा नसला तरी सुद्धा भारताने बंगाल्यांच्या विरुद्ध पाकिस्तानला अनुकूलता दाखविण्याचे काही कारण नाही.

पुन: अली यांनी आपल्या सत्तर कर्मचाऱ्यांच्या वतीने मसुद यांच्याशी बोलणी करण्याचे आधीपासूनच कबुल केले होते. तेव्हा यात भारताचा संबध येतो कुठे?

त्यामुळे ताश्कंदला उड्डाणासाठं सज्ज असलेले विमान तेथेच शांतपणे उभे होते.

बंगला देशाच्या जनतेला सहानुभूती व मदत देऊन आम्ही आगाऊपणा तर करीत नाही ना अशी वाटायची वेळ येते की काय अशी भीती निर्माण झाली आहे. म्हणजे असे की या मदतीमुळे याह्याखानांचे सैन्य पूर्व सीमेवर खोड्या करायला लागले आहे. यातून या दोन देशात युद्ध उभे राहिले नाही म्हणजे मिळवली.

याह्याखानांजवळ तेवढी ताकद उरली नाही, हे खरे. पण बंगला देशला अशी 'अगाऊ' मदत देऊन भारतासारख्या 'तिसऱ्या' देशाने मदत केली तशीच मदत चीन पाकला केव्हाही द्यायला तयार आहे, हे विसरता कामा नये. गेल्या आठवड्यात पाच मेला भारताने पाठविलेल्या निषेध खलित्यात सीमेवरील प्रक्षोभक हालचालीबद्दल पाकला सुनविले आहे, याचा अर्थ भारत याविषयी खंबीर धोरण घेऊ पहात आहे असा असेल तर उत्तम. नाहीतर कागदी घोडे नाचविण्याची आपली सवय तशी जुनी आहे.

आणखी एक गोष्ट. चीनविरुद्ध लढा झाल्यास त्याला तोंड देण्यासाठी म्हणून पाकिस्तानने अमेरिकेकडून शस्त्रे मिळविली होती. ती याह्याखान बंगला देश चळवळ चिरडण्यासाठी वापरत आहे असे अमेरिकेच्या गुप्त खात्याने गेल्या आठवड्यात सांगितले. यात भारताला नवीन असे काही नाही. कारण अमेरिकेचे मित्र असलो तरी १९६५ च्या युद्धात भारतीय सैन्याला सेबर जेट व पॅटन टँकचा प्रतिकार करावा लागला होता. फक्त यावेळी नवीन असे की अमेरिकन शस्त्रांबरोबरच चीनची भरघोस मदतही पाकला मिळणार आहे.

बंगालमधील वातावरण निवळेपर्यंत पाकला लष्करी मदत देऊ नये अशा हालचाली अमेरिकेत चालू आहेत, ही त्यातली समाधानाची बाब.

□ □ □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून, १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर

MANOOS (Weekly) : 50 Paise : Regd. No. M-H 649

# अग्निपुत्र

वसंत पोतदार

मूल्य चौदा रुपये
राजहंस प्रकाशन